कुटुंब, मित्र आणि निसर्गासोबत एक अविस्मरणीय दिवस!
ह्या सुट्टीचा महाआनंद आणि धमालच धमाल....
आमरस पार्टी वनभोजन
रेन डान्स / बोटींग / पपेट शो / बर्डपार्क / झीप लाईन / ॲडव्हेंचर्स / वॉटर स्पोर्टस्
डॉ. कांकरियांचे साईबन
9112288622
9850500905 / 9096639368
डॉ. कांकरियांचे साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी.मागे, अहिल्यानगर

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

नगरकरांसाठी समर प्लॅन
फक्त ₹550* मध्ये
FRIENDS & FAMILY साठी PERFECT प्लॅन
PACKAGE INCLUDES
Adventure Games / Swimming Pool
Rain Dance / Turf & Fun Activities
आवश्यक सुचना –
१) पूर्व बुकिंग आवश्यक
२) स्विमिंग कॉस्च्युम आवश्यक
३) मॅनेजमेंटचे सर्व निर्णय अंतिम असतील
रोज पिकअप व ड्रॉप सुविधा
बुकिंगसाठी संपर्क : 6262-90-6262 | व्हिंटेज हिल्स, दौंड रोड, अहिल्यानगर.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १५.०५.२०२६ | अंक नं. ०३८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ १११/-*
2014 पासून आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# बिबट्याला ठार मारण्यासाठी भयग्रस्त नागरिकांचा 'ठिय्या'

नगर – नगर तालुक्यातील सारोळा कासार शिवारातील बारेमळा परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून तीन बिबट्यांनी धुमाकूळ घातला असून, पाळीव प्राण्यांवर हल्ले करण्याबरोबरच १४ मे रोजी सायंकाळी एका लहान बालकावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे ग्रामस्थ भयभीत झाले असून, या बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी त्यांनी १५ मे रोजी दुपारी वनविभागाचे कार्यालय गाठून ठिय्या आंदोलन केले.

बारेमळा परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याचा वावर आहे. या ठिकाणी बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाने पिंजरा लावला आहे. मात्र बिबट्या या पिंजऱ्याला हुलकावणी देत आहे. गेल्या दहा–बारा दिवसांत बिबट्याने शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यांवर हल्ले करत त्यांचा फडशा पाडला आहे. १४ मे रोजी पहाटे चिकू इनामदार यांच्या गोठ्यात घुसून शेळी ओढून नेत तिला ठार केले. त्यानंतर सायंकाळी पुन्हा इनामदार यांच्या घराभोवती दोन बिबटे घिरट्या घालत असल्याचे निदर्शनास आले. तसेच परिसरातच आणखी एक तिसरा बिबट्या नागरिकांनी पाहिला. यातील एका बिबट्याने बालकावर हल्ल्याचा प्रयत्नही केला. मात्र परिसरातील काहींनी मोठ्याने आरडाओरड केल्याने सुदैवाने तो बालक बचावला. याबाबत वनविभागाला माहिती दिल्यानंतर रात्री वनविभागाचे पथक तेथे आले. या पथकाने ड्रोनद्वारे परिसरात पाहणी केली असता ड्रोनमध्ये तीन बिबटे असल्याचे दिसून आले. मात्र या बिबट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी करत ४० ते ५० नागरिकांनी रात्री उशीरापर्यंत वनविभागाच्या पथकासोबत परिसरात गस्त घालत पाहणी केली. रात्री उशीरा ड्रोनचे चार्जिंग संपल्यामुळे वनविभागाचे पथक निघून गेले. मात्र नागरिकांच्या भितीने झोप उडाली. मळ्यातील सर्वांनी रात्र अक्षरशः जागून काढली. हे बिबटे पिंजऱ्याला हुलकावणी देत असल्याने त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी त्यांना बेशुध्द करून पकडण्यात यावे किंवा गोळ्या घालून ठार मारण्याची परवानगी वरिष्ठ कार्यालयाकडून घ्यावी, या मागणीसाठी ग्रामस्थांनी १५ मे रोजी दुपारी वनविभागाच्या कार्यालयात जाऊन ठिय्या आंदोलन केले.

या आंदोलनात नगर बाजार समितीचे सहसचिव संजय काळे, सोसायटीचे संचालक जयप्रकाश पाटील संजय पाटील, बोरमळ्यातील नवनाथ कडूस, मयूर काळे, गुनूस इनामदार, चिकू इनामदार, संजय हारदे, सचिन कडूस, सोमनाथ कडूस, मतीन इनामदार, महेश वाव्हळ, बाळासाहेब वाव्हळ, जनार्दन गायगोवे, सतीश ढोरे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

बंदोबस्तासाठी वनविभागाच्या कार्यालयात केले आंदोलन



# राज्यातील वाहनांना १ जुलैपासून एचएसआरपी नंबर प्लेट बंधनकारक

## पोलिसांनी पकडल्यास भरावा लागणार १ हजार रुपये दंड

मुंबई – राज्यातील जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी अर्थात एचएसआरपी नंबर प्लेट बंधनकारक करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. येत्या १ जुलैपासून ज्या जुन्या वाहनांवर एचएसआरपी नसेल, त्यांच्यावर मोटर वाहन कायद्यानुसार १ हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे. त्यामुळे जुन्या वाहनधारकांनी ३० जूनपूर्वी ही नंबर प्लेट बसवून घ्यावी, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर आणि केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व जुन्या वाहनांना एचएसआरपी लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. सध्या शोरूममधून बाहेर पडणारी सर्व नवीन वाहने ही एचएसआरपी लावूनच रस्त्यावर येत आहेत. मात्र, जुन्या वाहनांच्या बाबतीत सरकारकडून तपासणी सुरू न झाल्याने, वाहनधारकांनी याकडे पूर्णपणे पाठ फिरवली होती. आता थेट दंडात्मक कारवाईची अंतिम तारीख निश्चित झाल्याने, नंबर प्लेटसाठी वाहनधारकांची पुन्हा एकदा गर्दी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

यापूर्वी सरकारने वाहनधारकांना दिलासा देत एचएसआरपी लावण्यासाठी गेल्या वर्षी ३० एप्रिल, ३० जून, १५ ऑगस्ट, ३० नोव्हेंबर आणि ३१ डिसेंबर अशा तब्बल पाच वेळा मुदतवाढ दिली होती. वारंवार संधी देऊनही अनेक वाहनधारकांनी नंबर प्लेट बदलली नसल्याने आता सरकारने सक्तीचे पाऊल उचलले आहे.

एचएसआरपी नसलेल्या आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर मोटर वाहन कायद्यानुसार कडक कारवाई केली जाईल आणि एक हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल. वाहनधारकांना ऑनलाईन पद्धतीने एचएसआरपी आरक्षित करण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी अंतिम मुदतवाढीची वाट न पाहता ३० जूनपूर्वी तातडीने आपल्या वाहनांवर एचएसआरपी बसवून घ्यावी, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

# अहिल्यानगर महानगरपालिकेची महासभा गणपूर्तीअभावी 'तहकूब'

## केवळ ४ ते ५ नगरसेवकांचीच उपस्थिती

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेची १५ मे रोजी आयोजित केलेली महासभा केवळ ४ ते ५ सदस्यांच्या उपस्थितीमुळे तहकूब करण्याची नामुष्की प्रशासनावर ओढावली. शहरातील प्रलंबित आणि महत्वाच्या विकासकामांवर या सभेत सखोल चर्चा होणे अपेक्षित होते. मात्र, लोकप्रतिनिधींनीच पाठ फिरवल्यामुळे अखेर गणपूर्ती (कोरम) अभावी ही सभा तहकूब करण्याचा निर्णय महापौर ज्योतीताई गाडे यांना घ्यावा लागला.

१५ मे रोजी आयोजित केलेल्या महासभेत ५ व्यापारी संकुल उभारण्याच्या मुद्यावर चर्चा होणार होती. तसेच शहरातील विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा होऊन निर्णय घेतले जाणार होते. मात्र, या सभेसाठी वेळेवर मोजकेच सदस्य सभागृहात उपस्थित राहिले. दीर्घकाळ वाट पाहूनही आवश्यक सदस्य संख्या पूर्ण न झाल्याने अखेर नियम आणि कायदेशीर तरतुदींनुसार सभा पुढील तारखेपर्यंत स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरम्यान, नगरसेवकांनी एवढ्या महत्त्वाच्या सभेला सामूहिक दांडी का मारली? यावर बोलताना मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी लोकप्रतिनिधींचे समर्थन केले. आयुक्त डांगे म्हणाले की, सध्या लग्नसराईचे दिवस सुरू आहेत. बहुतांश नगरसेवक आणि सदस्य आपापल्या भागातील लग्नकार्यांमध्ये, सार्वजनिक कामांमध्ये व्यस्त असावेत. त्यामुळे ते आजच्या सभेला उपस्थित राहू शकले नाहीत. सभा तहकूब होण्यामागे याव्यतिरिक्त दुसरे कोणतेही राजकीय किंवा तांत्रिक कारण नाही, असेही त्यांनी सांगितले.

महासभेत शहरातील नागरिकांच्या आणि पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवर निर्णय होणार होते. असे असताना लोकप्रतिनिधींनी लग्नकार्याला प्राधान्य दिल्याबद्दल विचारले असता आयुक्तांनी हात वर केले. लोकप्रतिनिधींना किंवा सदस्यांना महासभेला उपस्थित राहण्याबाबत प्रशासन म्हणून आम्ही कोणतीही सक्ती करू शकत नाही, असे म्हणत आयुक्तांनी या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

# 'वैद्यकिय'साठीची नीट परिक्षा आता २१ जून रोजी होणार

## राष्ट्रीय परीक्षा एजन्सीकडून नवीन वेळापत्रक प्रसिद्ध

नवी दिल्ली – वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली नीट परीक्षा पेपरफुटीमुळे रद्द झाली होती. आता रद्द झालेली परीक्षा पुन्हा घेण्यात येणार असून, राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने या परीक्षेची नवीन तारीख अधिकृतपणे जाहीर केली आहे. आता ही परीक्षा २१ जून रोजी पुन्हा घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठीचे ॲडमिट कार्ड देखील लवकरच अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केले जाईल, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.

यापूर्वी ३ मे रोजी देशभरातील विविध केंद्रांवर सुमारे २२ लाख ७९ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. मात्र, या परीक्षेपूर्वीच पेपर फुटल्याची बाब समोर आल्यानंतर एनटीएने १२ मे रोजी ही संपूर्ण परीक्षाच रद्द केली होती. परीक्षा २१ जून रोजी होणार असल्याने, त्यापूर्वी काही दिवस आधी विद्यार्थ्यांना एनटीएच्या अधिकृत वेबसाईटवरून आपले ॲडमिट कार्ड डाऊनलोड करता येणार आहे. यामध्ये परीक्षा केंद्र, वेळ आणि इतर मार्गदर्शक सूचनांचा समावेश असेल. विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षेसाठी अर्ज भरावा लागणार नाही. पूर्वीचा अर्ज ग्राह्य धरला जाणार आहे. तसेच परीक्षा शुल्कही भरावे लागणार नसल्याचे सांगण्यात आले.

एनटीएने विद्यार्थ्यांना आणि पालकांना आवाहन केले आहे की, परीक्षे संदर्भातील कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध होणाऱ्या सूचनांचेच पालन करावे. तसेच परीक्षेची प्रक्रिया अत्यंत पारदर्शक आणि सुरक्षित पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून कडक पावले उचलली जात आहेत.


SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

# आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर यंत्रणांनी संवेदनशील राहून समन्वयाने काम करावे

## पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश; जिल्हाधिकारी कार्यालयात पाणीटंचाई व मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक

नगर – जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारणासाठी सुरू असलेल्या उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबवून नागरिकांना सुरळीत आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून द्यावा. तसेच आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी आवश्यक ती पूर्वतयारी वेळेत पूर्ण करून आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवावी. टंचाई निवारण, पूर प्रतिबंधक उपाययोजना, आरोग्य सेवा, वीजपुरवठा, रस्ते दुरुस्ती आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा याबाबत कोणताही हलगर्जीपणा न करता सर्व यंत्रणांनी समन्वयाने व संवेदनशीलपणे काम करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात टंचाई व मान्सूनपूर्व तयारीच्या आढावा बैठकीत ना. विखे बोलत होते. या बैठकीस आमदार विठ्ठल लंघे, आमदार अमोल खताळ, आमदार विक्रमसिंह पाचपुते, जिल्हाधिकारी पंकज आशिया, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. दूरदृश्यप्रणालीद्वारे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार काशिनाथ दाते, आमदार हेमंत ओगले, आमदार किरण लहामटे, आ. आशुतोष काळे उपस्थित होते.



डॉ. विखे पाटील म्हणाले, ज्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे, तेथे पाणीपुरवठा नियमित आणि पारदर्शक पद्धतीने व्हावा. पिण्याच्या पाण्याच्या योजनांमध्ये कोणतीही अडचण निर्माण होणार नाही यासाठी संबंधित विभागांनी सतत समन्वय ठेवावा. जलस्रोतांची उपलब्धता, विहिरींची स्थिती, पाणीपुरवठा योजनांची कार्यक्षमता आणि टँकर व्यवस्थापन याचा नियमित आढावा घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

ते पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील गावे, वस्त्या, वाड्या आणि तांडे येथे टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असलेल्या ठिकाणी फिरते जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित करून नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यात यावा. गावांमध्ये लोकसंख्येच्या आधारावर पाण्याच्या टाक्या उभारून त्याद्वारेच पाणी वितरण करावे. यामुळे पाण्याचा अपव्यय टळून प्रत्येक नागरिकाला समानतेने पाणी मिळण्यास मदत होईल. टाक्यांची नियमित स्वच्छता करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे गावनिहाय वेळापत्रक निश्चित करण्यात यावे आणि त्याच वेळापत्रकानुसार पाणी वितरण करण्यात यावे. पाणी वाटपावेळी तलाठी आणि ग्रामसेवक यांची उपस्थिती बंधनकारक करण्यात यावी. पाणी वितरणामध्ये निष्काळजीपणा झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी. जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पिण्याचे स्वच्छ आणि शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात. आरोग्य विभागाने प्रत्येक गावातील पाण्याचे नमुने नियमित तपासून त्याचा अहवाल दर आठवड्याला सादर करावा. दूषित पाण्यामुळे उद्भवणाऱ्या साथीच्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आरोग्य यंत्रणांनी सज्ज राहावे, अशाही सूचना त्यांनी दिल्या.

जिल्ह्यात विविध यंत्रणांमार्फत पाणीपुरवठ्यासंदर्भात सुरू असलेल्या योजनांच्या ठिकाणी जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित करण्यात यावेत. नादुरुस्त जलशुद्धीकरण प्रकल्प तातडीने दुरुस्त करून कार्यान्वित करण्यात यावेत. प्रशासनाने नागरिकांच्या तक्रारींना तातडीने प्रतिसाद देऊन संवेदनशीलतेने कार्य करावे. पावसाळ्यात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्यावर तत्काळ नियंत्रण मिळवण्यासाठी विभागांमध्ये प्रभावी समन्वय असणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी सज्ज राहून नागरिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने काम करावे, अशा सूचनाही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी यावेळी दिल्या.

निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी जिल्ह्यातील टंचाई परिस्थिती, पाणीपुरवठा, टँकर व्यवस्थापन तसेच मान्सूनपूर्व तयारीबाबत सविस्तर माहिती सादर केली. बैठकीस सर्व संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

यंदा जावयाला धोंडे
वातानुकुलित हॉल मध्ये शाही थाटात !
खास अधिक मास निमित्त
अन्नपुर्णा केटरर्स आयोजित
धोंडा व आमरस महोत्सव
दि. १७ मे ते १४ जून २०२६
५० ते १०० व्यक्तिंसाठी 810/- रु. प्रति व्यक्ति
१०१ ते २०० व्यक्तिंसाठी 720/- रु. प्रति व्यक्ति
रॉयल एसी. बँक्वेट हॉल शाही भोजन व्यवस्था
समाविष्ट सुविधा : * ५ हजार स्क्वे.फू. डेकोरेटीव्ह एसी. हॉल * शाही भोजन बैठक व्यवस्था, ७५ व्यक्ति प्रति पंगत (फोटोप्रमाणे) * धोंडा, पुरणपोळी, १ स्वीट, आमटी व इतर मेनू आपल्या ऑर्डरनुसार * अतिरिक्त डेकोरेशन सेवा उपलब्ध (चार्जेबल)
स्थळ : रॉयल एसी, बँक्वेट हॉल, दुसरा मजला, बडीसाजन मंगल कार्यालय, आनंद हॉस्पिटल शेजारी
अन्नपुर्णा केटरर्स
ऑफिस : पांजरपोळ गोरक्षण संस्था, अरणगाव रोड, अ.नगर
अधिक माहिती व बुकिंगसाठी संपर्क :
संतोष गुगळे : मो. 98 23 22 23 40
दिपेश गुगळे : मो. 78 88 04 23 40

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## बोगस बियाणे, खतांचा काळाबाजार आणि पीक विमा कंपन्यांच्या दिरंगाईवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करा : पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे यांच्या सूचना

### जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व नियोजन बैठक

नगर - बोगस बियाणे व खत विक्रेत्यांवर केवळ परवाने निलंबित करण्याची औपचारिक कारवाई न करता थेट फौजदारी गुन्हे दाखल करावेत, खतांचा काळाबाजार, सक्तीची जोडविक्री व निर्धारित दरापेक्षा जास्त दराने विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या पीक विमा कंपन्यांवरही गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशा सूचना जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी येथे दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित खरीप हंगामपूर्व नियोजन बैठकीत पालकमंत्री डॉ. विखे पाटील बोलत होते. यावेळी आमदार अमोल खताळ, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, आमदार विक्रमसिंह पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, आत्माचे प्रकल्प संचालक प्रदीप लाटे, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे संचालक डॉ.जी.के.ससाणे, डॉ.प्रशांत बोडके, दूरदृश्य प्रणालीद्वारे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार हेमंत ओगले, आमदार किरण लहामटे, उपविभागीय महसूल, कृषी अधिकारी, तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी आदी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, खरीप हंगामात खतांची कृत्रिम टंचाई निर्माण होणार नाही, यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन करावे. जिल्ह्यात खतांचा पुरेसा राखीव साठा उपलब्ध ठेवण्यात आला असून, पारंपरिक युरिया व डीएपीला प्रभावी पर्याय म्हणून 'नॅनो युरिया' व 'नॅनो डीएपी'च्या वापरास प्रोत्साहन द्यावे. खत खरेदी-विक्री प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी खतांच्या पिशव्यांवरील 'क्यूआर' प्रणाली व इलेक्ट्रॉनिक विक्री यंत्रणा प्रभावीपणे राबवावी. सर्व कृषी सेवा केंद्रांवर खतांचे दर व उपलब्ध साठा दर्शविणारे फलक लावणे बंधनकारक करण्यात यावे, असे निर्देश त्यांनी दिले.


जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित खरीप हंगामपूर्व नियोजन बैठकीत बोलताना पालकमंत्री डॉ. विखे पाटील. (छाया - समीर मन्यार)

सेंद्रिय व नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी कृषी विज्ञान केंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. उत्कृष्ट व नाविन्यपूर्ण काम करणाऱ्या शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेमार्फत विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करावे, जेणेकरून नैसर्गिक शेतीकडे इतर शेतकरी प्रेरित होतील, असे त्यांनी सांगितले.

शेतमजुरांच्या उपलब्धतेचा आढावा घेऊन नोंदणीकृत मजुरांना प्रत्यक्ष शेतीच्या कामात सहभागी करून घ्यावे. निष्क्रिय मजुरांबाबत आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करून शेतीची कामे वेळेत पूर्ण होतील, याची दक्षता घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

शेतकऱ्यांपर्यंत कृषी विभागाच्या योजना, हवामान अंदाज व आधुनिक तंत्रज्ञान पोहोचवण्यासाठी गावपातळीवर व्हॉट्सप गट तयार करावेत. शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट व 'शेतकरी शास्त्रज्ञ मंच'च्या माध्यमातून कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले.

राज्याबाहेरून, विशेषतः सीमावर्ती भागांतून येणाऱ्या बोगस बियाण्यांच्या विक्रीला आळा घालण्यासाठी पोलिसांच्या मदतीने तपासणी नाके उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कापूस, सोयाबीन व रब्बी ज्वारीच्या बियाण्यांमध्ये झालेल्या फसवणुकीची गंभीर दखल घेत अनधिकृत विक्रेत्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

खरेदी केलेल्या खतांच्या वाहतुकीसाठी शेतकऱ्यांकडून जादा भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारींची दखल घेत 'राष्ट्रीय केमिकल्स अ‍ॅण्ड फर्टिलायझर्स' कंपनीकडून १०० किलोमीटरपर्यंत उपलब्ध असलेल्या मोफत वाहतूक सुविधेचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी वैयक्तिक लक्ष घालावे, असे निर्देशही यावेळी देण्यात आले.

प्रास्ताविकात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सांगितले की, जिल्ह्यात खते व बियाण्यांची कृत्रिम टंचाई तसेच गैरप्रकार रोखण्यासाठी गुणवत्ता नियंत्रणावर विशेष भर देण्यात आला आहे. आतापर्यंत ११ हजार तपासण्या पूर्ण करून १०३ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांविरोधात २ पोलीस केसेस व १९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जागतिक परिस्थितीमुळे युरिया व डीएपी खतांचा संभाव्य तुटवडा लक्षात घेऊन ५ हजार ४०० मेट्रिक टन खताचा राखीव साठा निर्माण करण्यात आला असून, त्यापैकी ७५० मेट्रिक टन साठा सध्या उपलब्ध आहे. अल-निनोच्या पार्श्वभूमीवर कमी पावसाचा अंदाज लक्षात घेऊन कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांबाबत विशेष जनजागृती करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत अहिल्यानगर जिल्ह्याने राज्यात आघाडी घेतली असून, पीएमएफएमई योजनेत सलग दोन वर्षे जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर राहिला आहे. कृषी यांत्रिकीकरणात एक लाखांहून अधिक शेतकऱ्यांना लाभ देणारा हा राज्यातील एकमेव जिल्हा ठरला आहे. 'महा-विस्तार' अ‍ॅपवर ३ लाखांहून अधिक शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून, जिल्ह्यात १२ हजार ५०० एकर क्षेत्रावर नैसर्गिक शेतीचे प्रयोग सुरू असल्याची माहितीही डॉ. आशिया यांनी दिली.बैठकीत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी सादरीकरण केले. यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते कृषी विभागाच्या विविध योजनांच्या माहितीपुस्तिकेचे व संतुलित खत वापर जागरूकता अभियान पोस्टरचे प्रकाशन करण्यात आले.

## अ‍ॅड. सोनालीताई कचरे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - भूतकरवाडी, भिंगारदिवे मळा येथील रहिवासी अ‍ॅड. सोनालीताई बबन कचरे (वय २७) यांचे १५ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, भाऊ, बहिण, चुलते, चुलती असा परिवार आहे.

## अनुसयाबाई खांदवे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - सांडवे (ता.नगर) येथील रहिवासी अनुसयाबाई निवृत्ती खांदवे (वय ८५) यांचे १५ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सांडवे अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, सुना, मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ऑडीटर उद्धव खांदवे यांच्या त्या मातोश्री होत.

## किशोरीबाई कांबळे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - निर्मलनगर, रेणावीकर कॉलनी येथील रहिवासी श्रीमती किशोरीबाई विनायक कांबळे (वय ८२) याचे १४ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या लक्ष्मीनारायण शिशु शिक्षण मंदिरच्या निवृत्त मुख्याध्यापिका होत्या.

## देवकीबाई साखला यांचे आकस्मिक निधन



नगर - सारसनगर येथील रहिवासी देवकीबाई अशोक साखला (वय ६५) यांचे १३ मे रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १४ मे रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## राजेंद्रकुमार लोढा यांचे संथारा व्रतात निधन



नगर - गंजबाजार येथील रहिवासी राजेंद्रकुमार बन्सीलाल लोढा (वय ६४) यांचे संथारा व्रतात १४ मे रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १५ मे रोजी जयपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, ७ भाऊ, भावजय, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. किर्तीकुमार, संजयकुमार, ललीतकुमार यांचे ते मोठे बंधू तर प्रमोदकुमार, अनिलकुमार, सुनिलकुमार, नितीनकुमार यांचे ते लहान बंधू होत.

## विठ्ठल जिंदम यांचे अल्प आजाराने निधन



नगर - कल्याण रोड, शिवाजीनगर, बालाजी सोसायटी येथील रहिवासी विठ्ठल यल्लया जिंदम (वय ७५) यांचे १५ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, सुना, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## एकनाथ खांदवे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - सांडवे (ता. जि. नगर) येथील रहिवासी एकनाथ विठोबा खांदवे (नाथादादा) (वय ८०) यांचे १३ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १३ मे रोजी सांडवे अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, मुली, सूना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

## सिंधुताई मगर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सावेडीतील रेणावीकर शाळेसमोर राहणाऱ्या श्रीमती सिंधुताई मच्छिंद्र मगर (वय ७२) यांचे ११ मे रोजी पहाटे ५ वाजता अल्प आजाराने निधन झाले. येथील अमरधाममध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सिंधुताई या मूळच्या गोगलगाव (ता. राहाता) येथील रहिवासी होत्या. त्यांच्यामागे डॉ. स्वरुपकुमार मगर व इंजि. दीपक मगर ही दोन मुले तसेच वंदना दशरथ काळे व मनीषा संजय लोंढे या दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. युनियन बँकेचे निवृत्त अधिकारी (स्व.) मच्छिंद्र मगर यांच्या त्या पत्नी होत.

## आबासाहेब बर्वे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील मुळा - प्रवराचे माजी कर्मचारी आबासाहेब संतराम बर्वे (वय ७९) यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अमोल बर्वे व संकेत बर्वे यांचे वडील होत.

## भिंगारमधून घरातून चोरी; लाखोंचा ऐवज लंपास

### सोन्या-चांदीचे दागिने व रोकडचा समावेश, आलमगीर रोडवरील घटना

नगर - भिंगार शहरातील आलमगीर रोड परिसरात असलेल्या श्रीराम कॉलनीमध्ये अज्ञात चोरट्यांनी बंद घराचा कडीकोयंडा तोडून सुमारे ६ लाख ६० हजार ६०० रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुनील पितांबर पाठक (वय ५६, रा. हॉटेल जलसाच्या पाठीमागे, श्रीराम कॉलनी, आलमगीर रोड, भिंगार) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे राहते घराला कुलूप लावून १२ मे रोजी बाहेर गावी गेलेले होते. १४ मे रोजी ते घरी परतल्यावर त्यांना घरात चोरी झाल्याचे समजले. १२ मे ते १४ मे या दरम्यान चोरट्यांनी त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील कपाटाचे कुलूप तोडून ५६ हजार रुपयांची रोख रक्कम आणि सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण ६ लाख ६० हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. यामध्ये सोन्याची गोफ, माळ, अंगठ्या, कानातले कर्णफुले आणि चांदीच्या वस्तूंचा समावेश आहे. याबाबत त्यांनी भिंगार कॅम्प पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणी सुनील पाठक यांनी दिलेल्या तक्रारीवरून भिंगार कॅम्प पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३३१(३), ३३१(४) आणि ३०५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे करत आहेत.

## आकडा टाकून विजेची चोरी; दोन जणांवर गुन्हे दाखल

नगर - नगर तालुक्यातील देहरे येथे विज कनेक्शन च्या सर्व्हिस वायर वर आकडा टाकून वीज चोरी करणाऱ्या दोघांवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा कलम १३५ नुसार नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वीज वितरण कंपनीच्या देहरे शाखा कार्यालयाचे सहाय्यक अभियंता ऋतुराज लक्ष्मण शिंदे (वय २४, रा.देहरे, ता.नगर) यांनी याबाबत फिर्यादी दिली आहे. फिर्यादी अभियंता शिंदे यांच्या सह वीज कर्मचारी झुंजार जाधव, संतोष भिंगारदिवे हे बाहेरील पंच ऋषिकेश एकशिंगे व नितीन लवांडे यांच्या सोबत १६ एप्रिल रोजी सकाळी देहरे परिसरात वीज चोरी शोधत असताना रमेश सखाराम जेठे (रा. देहरे) यांनी त्यांच्या घराजवळील विजेच्या खांबावरून मीटर कडे येणाऱ्या सर्व्हिस वायर कट करून त्यावर दुसऱ्या केबलच्या सहाय्याने आकडा टाकून घरात अनधिकृत वीज पुरवठा घेतल्याचे समोर आले. रमेश जेठे यांनी गेल्या वर्षभरात सुमारे १६ हजार १०० रुपये किंमतीची ९९२ युनिट वीज चोरी केली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

तसेच दुसऱ्या ठिकाणी शिवाजी नामदेव मगर यांनी घराजवळील विजेच्या खांबावर आकडा टाकून अनधिकृत वीज पुरवठा घेतल्याचे समोर आले. मगर यांनी गेल्या वर्षभरात सुमारे २३ हजार ९२२ रुपये किंमतीची १४०२ युनिट वीज चोरी केली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी दोन वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत.

## केडगावमध्ये भरदिवसा दोन ठिकाणी चोऱ्या

### रोकडसह सोन्याचे दागिने लंपास, २ चोरट्यांना नागरिकांनी घरात कोंडले

नगर - केडगाव उपनगरात १४ मे रोजी भरदिवसा २ ठिकाणी चोरट्यांनी घरे फोडून चोऱ्या केल्या. यामध्ये सोन्याच्या दागिन्यांसह रोख रक्कम चोरीला गेली आहे. दरम्यान एका घरात चोरटे घुसल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास येताच त्यांनी २ चोरट्यांना त्या घरातच कोंडून ठेवत पोलिसांच्या हवाली केले आहे.

घरफोडीची पहिली घटना दुपारी १२.१५ ते २.३० च्या दरम्यान केडगाव येथील इंडस्ट्रियल एरिया भागात असलेल्या समर्थ नगरमध्ये राजू सोन्याबापू गहीले यांच्या साईलिला निवासस्थान येथे घडली. फिर्यादी राजू गहीले हे दुपारी घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. दुपारी १२:१५ ते २:३० वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करत हॉलमधील टीव्ही युनिटच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेले ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र, अडीच हजार रुपयांच्या चांदीच्या रिंग आणि १० हजार रुपयांची रोख रक्कम असा मुद्देमाल लंपास केला. फिर्यादी दुपारी घरी परतल्यानंतर त्यांना घराचे कुलूप तुटल्याचे आणि चोरी झाल्याचे लक्षात आले.

या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड आणि इतर अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार गाजरे करत आहेत. दुसरी घटना भुषणनगरच्या झेंडा चौक परिसरात घडली. या भागात आरटीएम जीमच्या शेजारी राहणारे शिवाजी गोविंद बोऱ्हाडे (वय ५७) यांच्या घराचा लोखंडी व लाकडी दरवाचा चोरट्यांनी कटरच्या सहाय्याने तोडून आत प्रवेश केला. घरातील लोखंडी कपात तोडून त्यात ठेवलेले १ लाख ३० हजार रुपये किंमतीचे दागिने चोरले.

### नागरिकांच्या सतर्कतेने चोरटे जेरबंद

दरम्यान या घरात चोरटे घुसले असल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास येताच त्यांनी तेथे जमा होत सदर घराचा दरवाजा बाहेरून लावून घेत चोरट्यांना घरातच कोंडून ठेवले. तसेच याबाबत कोतवाली पोलिसांना माहिती दिली. ही माहिती मिळताच कोतवाली पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घरात कोंडून ठेवलेल्या शंकरलाल जगदीश (वय २५,रा. नशिराबाद,जि.अजमेर, राजस्थान) व अजय बद्री (वय १८, रा. जैसलमेर जवळ, राजस्थान) या दोघांना ताब्यात घेतले. या प्रकरणी शिवाजी बोऱ्हाडे यांच्या फिर्यादी वरून ताब्यात घेतलेल्या दोघांवर घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

## रिक्षा प्रवासात महिलेचे सोन्याचे दागिने लंपास

नगर - शहरातील तारकपूर बसस्थानक ते मुकुंदनगर दरम्यान रिक्षाने प्रवास करणाऱ्या एका वृद्ध महिलेचे सोन्याचे दागिने अज्ञाताने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत बद्रूनिसा वजीर मोमीन (वय ६५, रा.आदर्शनगर, वार्ड क्र.१, श्रीरामपूर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिला १० मे रोजी आपल्या पतीसोबत श्रीरामपूर येथून अहिल्यानगरला एका नातेवाईकाच्या लग्नासाठी आल्या होत्या. तारकपूर बसस्थानकावर उतरल्यानंतर त्या एका रिक्षामध्ये बसल्या. प्रवासादरम्यान त्यांनी आपल्या जवळील ३० हजार रुपये किमतीचे ११ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गल्सर गळ्यात घातले होते. रिक्षाचालकाने त्यांना मुकुंदनगर गेटवर सोडले. तेथून दुसऱ्या रिक्षानी त्या लग्न समारंभाच्या ठिकाणी पोहोचल्या. दुपारी दोन वाजेच्या सुमारास त्यांना आपल्या गळ्यातील सोन्याचे दागिने गायब असल्याचे लक्षात आले. सर्वत्र शोध घेऊनही दागिने मिळून आले नाहीत. रिक्षा प्रवासाचा फायदा घेऊन कोणीतरी अज्ञात इसमाने नजर चुकवून हे दागिने लंपास केले असल्याची खात्री पटल्याने त्यांनी १४ मे रोजी पोलिस ठाण्यात धाव घेतली. तोफखाना पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार राऊत करत आहेत.

## राहूल सिद्धू यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार - येथील सुदर्शन कॉलनीतील रहिवासी राहूल अरुण सिद्धू (वय ४८) यांचे १५ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, १ भाऊ, २ मुले, भावजय असा परिवार आहे.

## दत्तात्रय नागपूरे यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार - धनगर गल्ली, भिंगार येथील रहिवासी दत्तात्रय नागपुरे (वय ७५) यांचे १५ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, ४ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सुरज, धिरज, मनोज, गणेश नागपुरे यांचे ते वडील होत.

## महेश कपिले यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील किशोर सिनेप्लेक्स समोरील रहिवासी व रिक्षाचालक महेश जगन्नाथ कपिले (वय ५८) यांचे १४ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ भाऊ, १ मुलगा, २ मुली, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

तहसील कार्यालयातील सेवानिवृत्त कर्मचारी शरद कपिले यांचे ते धाकटे बंधू, आयसीआयसीआय बँकेचे डेप्युटी मॅनेजर ऋषिकेश कपिले यांचे वडील, दिपक व संदीप कपिले यांचे ते चुलते होत.

## पेन्शनसाठी वयोवृद्धांचे मनपात धरणे आंदोलन

### कर्मचाऱ्यांचे वेतन, पेन्शन देण्याचे आयुक्तांचे आश्वासन

नगर - महानगरपालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मार्च आणि एप्रिल या दोन महिन्यांची रखडलेली पेन्शन, सहाव्या वेतन आयोगातील उर्वरित नऊ हप्ते तसेच इतर प्रलंबित आर्थिक मागण्या तात्काळ मंजूर करण्यात याव्यात, या मागणीसाठी महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या वतीने महापालिकेत धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान महापालिका प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

महापालिका पेन्शनर असोसिएशनचे राज्याध्यक्ष एन. एम. पवळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी, सेवानिवृत्त कर्मचारी आणि कामगार उपस्थित होते. आंदोलनकर्त्यांनी महापालिकेच्या आर्थिक नियोजनातील ढिसाळ कारभारामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना नियमित पेन्शनपासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप केला.

आंदोलनादरम्यान आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले. निवेदन स्वीकारताना आयुक्तांनी कामगारांचे दोन महिन्यांचे वेतन, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची पेन्शन तसेच सहाव्या वेतन आयोगातील फरकाची रक्कम देण्याचे आश्वासन दिले. प्रशासनाकडून सकारात्मक भूमिका घेतल्याने आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले.


महानगरपालिकेत पेन्शनसाठी आंदोलन करताना वयोवृद्ध सेवानिवृत्त कर्मचारी.

यावेळी एन. एम. पवळे, एन. एम. देशमुख आणि कामगार नेते कॉ. अनंत लोखंडे यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका मांडली. महापालिकेकडून वेळेवर पेन्शन न मिळाल्याने अनेक निवृत्त कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. काही जण उपचाराअभावी मृत्युमुखी पडले आहेत, असा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला. आंदोलनाच्या प्रारंभी दिवंगत सभासदांना श्रद्धांजली अर्पण करून आंदोलनास सुरुवात करण्यात आली.

आंदोलनकर्त्यांनी प्रशासनासमोर अनेक मागण्या मांडल्या. मागील दोन महिन्यांची थकीत पेन्शन तात्काळ अदा करावी, प्रत्येक महिन्याची पेन्शन एक तारखेलाच जमा करण्यात यावी, जीएसटी अनुदान महिन्याच्या पहिल्या तारखेपूर्वी उपलब्ध करून द्यावे, सहाव्या वेतन आयोगाची राहिलेली थकबाकी तत्काळ वितरित करावी तसेच महानगरपालिकेने बंद केलेली पेन्शन विक्री योजना पुन्हा सुरू करावी, अशा मागण्यांचा निवेदनात समावेश होता.

या आंदोलनात मधुकर खताळ, एच. आर. सय्यद, द्वारका किंगर, संजय मुठाळ, बबन काळे, ज्ञानेश्वर धिरडे, किशोर पाखळे, दत्तात्रय व्यापारी, वसंत शिंदे, रंगनाथ गावडे, दिलीप पाठक, रामचंद्र कदम, टेकाळे, संजय पटेकर, बबन खरमाळे, रफिक शेख, एस. एम. बोरगे, ठका कराळे, मोहन खपके, राजेंद्र सारसर, पांडुरंग गाडे, इम्तियाज शेख, अनवर शेख सहभागी झाले होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे पाठ दुखी व मणके विकार तपासणी शिबिराचे उद्घाटन श्रीमती सीमा शेटीया सीए प्रणेश शेटीया, सीए सौ.सलोनी शेटीया, कु.प्रतीक्षा शेटीया व शेटीया परिवाराच्या वतीने दीपप्रज्वलनाने करण्यात आले होते.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलचा रुग्णसेवेचा महायज्ञ अखंडपणे सुरू आहे

## श्रीमती सीमा शेटीया यांचे प्रतिपादन; पाठ दुखी व मणके विकार तपासणी शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद, ७५ रुग्णांची तपासणी

नगर – आचार्य आनंदऋषींजींच्या प्रेरणेने हॉस्पिटलमध्ये मोठ्या प्रमाणात सेवेचे कार्य सुरू आहे. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत रुग्णसेवा मिळावी. यासाठी रुग्णसेवेचा महायज्ञ अखंडपणे सुरू आहे. समाजातील गरजू रुग्णांना मोफत व अल्प दरात रुग्णसेवा मिळावी. यासाठी आनंद ऋषीजी हॉस्पिटलच्या मार्फत मोठ्या प्रमाणात आरोग्य शिबिरे घेतले जातात ही कौतुकास्पद बाब आहे. शिबिराच्या माध्यमातून शेटीया परिवाराला रुग्ण सेवेची संधी दिली आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलचा रुग्णसेवेचा महायज्ञ अखंडपणे सुरू राहील, असे प्रतिपादन श्रीमती सीमा शेटीया यांनी केले.

आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे पाठ दुखी व मणके विकार तपासणी शिबिराचे उद्घाटन श्रीमती सीमा शेटीया सीए प्रणेश शेटीया, सीए सौ.सलोनी शेटीया, कु.प्रतीक्षा शेटीया व शेटीया परिवाराच्या वतीने दीपप्रज्वलनाने करण्यात आले होते. याप्रसंगी अजित शेटीया, निलेश छाजेड, सौ.सारिका छाजेड, सौ. सारिका पारख, तसेच गणेश कांकरिया, गौतम चोरडिया, राजेंद्र तातेड, धन्यकुमार बरमेचा, अमोद बोथरा व मित्र परीवार, जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया, माणकचंद कटारिया, सतीश लोढा, वसंत चोपडा, डॉ.आशिष भंडारी, सुभाष मुनोत, अभय गुगळे, प्रकाश छल्लाणी, शिबिराचे तज्ञ डॉक्टर डॉ.भरत जगताप, डॉ.विशाल शिंदे, डॉ.रोहन धोत्रे, डॉ.श्रीकांत दलाल आदी उपस्थित होते.

सीए सौ.सलोनी शेटीया म्हणाले, शेटीया परिवाराला आरोग्य शिबिराच्या माध्यमातून खारीचा वाटा उचलण्याची संधी मिळाली आहे. हे शेटीया परिवाराचे भाग्य समजते.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये गरजू रुग्णांना मोफत व अल्प दरात उपचार करून त्यांना बरे केले जाते. यामुळे आनंदऋषीजी हॉस्पिटलची कीर्ती सर्व दूर पसरली आहे.

डॉ.भरत जगताप म्हणाले, पूर्वी समाजामध्ये मनके विकाराच्या ऑपरेशनमुळे पायाची ताकद जाते, रुग्ण दगावतो अशा प्रकारची भीती होती. परंतु आता प्रगत तंत्रज्ञानामुळे व उपलब्ध सोयी सुविधांमुळे दुर्बिणीद्वारे चांगल्या पद्धतीने शस्त्रक्रिया होत असल्याने रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा. मणके विकार संबंधी हॉस्पिटलमध्ये पूर्णवेळ वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. येथे उपचारासाठी आलेल्या रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ घेता येईल. या शिबिराचा रुग्णांनी लाभ घ्यावा. असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

डॉ.आशिष भंडारी यांनी सूत्रसंचालन केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले. या शिबिरात ७५ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

# 'राधेय महिला गृह उद्योग' तर्फे नगर येथे २३ व २४ मे रोजी आनंद नगरी खरेदी महोत्सव

नगर – राधेय महिला गृह उद्योग यांच्या वतीने घरगुती व आकर्षक उत्पादनांची मेजवानी देणारा आनंद नगरी खरेदी महोत्सव २३ व २४ मे रोजी इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय, नागेश्वर मंदिर समोर, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. हा महोत्सव सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत भरविण्यात येणार आहे.

उन्हाळी सुटीच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवामध्ये घरगुती उद्योगांच्या विविध उत्पादनांचे स्टॉल्स उभारण्यात येणार असून कपडे, ज्वेलरी, फूड प्रॉडक्ट्स, हस्तकला वस्तू, ब्यूटी प्रॉडक्ट्स यांसह गेम स्टॉल्स आणि आकर्षक लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवात सहभागी होण्यासाठी व (स्टॉलसाठी नाव नोंदणी) इच्छुकांनी सौ. उज्वला मालू (७०२०३ ५२८१२) तसेच सौ. स्वाती नागोरी (९६५७९ ११०६१) यांच्याशी तातडीने संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मौलाना आझाद उर्दू मुलींच्या हायस्कुलमधील विद्यार्थिनींचे यश



शेख निदा | शेख मरियम | शेख जैनब

नगर – मोहंमदिया एज्युकेशन सोसायटी संचलीत मौलाना आझाद उर्दू मुलींचे हायस्कुल, मुकुंदनगर, अहिल्यानगरच्या माहे मार्च २०२६ मध्ये झालेल्या एस.एस.सी. परीक्षेचा निकाल ९४.४४% लागला असुन प्रथम क्रमांक कुमारी शेख निदा नविद–४४८ गुण, व्दितीय क्रमांक कुमारी शेख मरियम सरफराज ४४६ गुण व तृतीय क्रमांक कुमारी शेख जैनब वसीम अहमद ४४४ गुण प्राप्त करून उत्तीर्ण झाले. विशेष योग्यतेने ०७ विद्यार्थिनी, प्रथम श्रेणीत ३२ विद्यार्थिनी, व्दितीय श्रेणीत ३७ विद्यार्थिनी व उत्तीर्ण श्रेणीत ०९ विद्यार्थिनी असे एकुण ८५ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत.

शाळेच्या मुख्याध्यापिका फरहाना गालिब मिर्झा, शेख अ.हसीब, शेख नाजेमा, शेख यास्मिन व शिक्षकांचे संस्थेचे सचिव व प्रमुख कार्यवाह डॉ. प्रा.शेख अब्दुस सलाम अब्दुल अजीज व इतर पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## अवघाची संसार, सुखाचा करीन

"मुसाफिर"
वाचनीय मननीय
संकलनः दिशान फिचर्स




माझ्यावर नाही कसली जबाबदारी, मी आधीच घेतली आहे खबरदारी दोषाचं खापर दुसऱ्याच्या माथ्यावरी ! उगाच का माझ्यावर रोष? माझा नाहीच काही दोष. असेल मी कामचुकार ! नसेन कामात वाकबगार; पण दुसरे तरी काय लागून गेलेत मोठे हुशार ? साहेबाचे झिजवतात उंबरठे आणि मिरवतात मग मोठे? आम्हाला नका सांगू ते महाभारतातील सुभाषित,

मजुरी करणाऱ्यांना काम न मिळालं, तर वाटेल भीती. उपासमार होईल हे भय त्यांना किती? काहींना नाही खाण्यापिण्याची ददात; पण त्यांना केवढं भय, की सदा दिसतो मृत्यूच दारात ! सज्ञानांना तर भोवतो साधा अपमान ? अपमानापेक्षा मृत्यू बरा मान ! त्यांना वाटतं चालावं सदा ताठ ठेवून मान ! पण आम्ही म्हणतो कशाला हवेत हे मानापमान ? कातडी वाचवायचे तेवढे ठेवा भान, काम न करता मिळवा दाम. लाजलज्जा बाळगण्यात काय राम? बा माणसा ! पण असली वृत्ती नाही बरे ! अरे, ही तर हरामखोरी स्वतःच्याच उरी स्वतःच का खुपसायची सुरी? प्रामाणिकपणे आपलं काम करणं हीच माणुसकी. कामात चोख, घ्यावं रोख, अन्यथा ती चोरी ! वर पुन्हा करायची शिरजोरी? जनाबाइचं दळण दळणारा पांडुरंग संतांना श्रमाचं प्रतीक जाणवतो. संकटात सापडलेल्या भक्ताकडे धावणारा विठ्ठल संतांना मूर्तिमंत प्रामाणिकपणाच जाणवतो. भक्तांचे संसार सुखाचे करणारा विठ्ठल संतांना एकमेव कर्तव्यतत्पर, गुणवंत म्हणून भावतो. मग नामदेव तुम्हांला ग्वाही देतो,

तो तुमच्या अंत:करणातला परमात्मा सगळ्यांचे संसार सुखाचे करील. ती आपली जबाबदारी आहे हे तो कधी न विसरेल. आनंदाची पखरण करायला सदैव तत्पर असेल. दैन्य, दुःख व दारिद्र्य घालवायला तुम्हाला सहाय्य करील. ही एक जुनी कहाणी. एक म्हातारी दीनवाणी. तिचा आधार एक दुभती गाय आणि तीच मरण पावली. चरत होती. देवदत्ताच्या घराची भिंत पडली. त्याखाली गाय दबली!

म्हातारी राजाकडे गेली. देवदत्ताला दोष देऊ लागली. राजानं देवदत्ताला बोलावलं. देवदत्त म्हणाला, भिंत पडली हे खरे; पण त्यासाठी मी जबाबदार नाही ! त्या गवंड्यानं भिंत नीट बांधली नाही. मग राजानं गवंड्याला बोलावलं. तो गवंडी म्हणाला, भिंत पडली हे खरं; पण त्याची जबाबदारी माझ्यावर नाही. घराची भिंत बांधली तेव्हा मातीत त्या पाणक्यानं पाणी जास्त टाकलं ! माती पातळ झाली. भिंत पडली !

मग राजानं पाणक्याला बोलावलं. तो म्हणाला, दोष माझा नाही. पाणी ओतायचं मडकं त्या कुंभारानं मोठं केलं ! पाणी खूप मावलं. माती पातळ करून बसलं ! म्हणून भिंत पडली. दोष त्या कुंभाराचा. राजानं बोलावलं कुंभाराला. कुंभार म्हणाला, अपराध माझा नाही. मी मोठ मडकं जाणूनबुजून नाही केलं. राजाची मिरवणूक जात होती. राजा सुरेख दिसत होता. मी तिकडे पाहत बसलो. भान विसरलो. मडकं मोठं होतयं हे मला कळलचं नाही. तेव्हा भिंत पडली हे खरं; पण त्याला जबाबदार राजाची स्वारी !

आता राजा म्हणाला, मग मी मलाच करतो दंड भारी ! तेवढ्यात म्हणाली म्हातारी, गाय गेली ही माझ्यावर कृपाच झाली. अहो ती दूधच देत नव्हती. प्रेमापायी मला ती टाकवतही नव्हती ! त्या गायीला मारणाऱ्या या भिंतीचा मालक देवदत्त यानं माझ्यावर कृपा केली. मी ही सोन्याची अंगठी देवदत्ताला देते.

लगेच गवंडी पुढं झाला. भिंत माझ्या चुकीनं पडली, म्हणाला. तेव्हा अंगठी द्यावी मला. लगेच पाणिक्या पुढं झाला. म्हणाला, भिंत पडली त्याला धरा जबाबदार मला. अंगठी द्या मला. तेवढ्यात कुंभार पुढं सरसावला. अपराध माझा म्हणाला. बक्षीस द्यावे ते मला ! तोच राजानं आपला हात पुढं केला. माझी मिरवणूक गेली. कुंभाराला माझ्या सौंदर्यानं भुरळ घातली. तेव्हा माझ्याचमुळे भिंत पडली. अंगठी पाहिजे मलाच मिळाली !

म्हातारी खुदकन हसली. म्हणाली, मी गरीब दुबळी. माझ्याजवळ कुठली अंगठी ? आता राजा हसला. म्हातारीवर खूश झाला. म्हणाला, तू सगळ्या बेजबाबदारांना धडा दिला. मी एकाऐवजी चार गायी देतो बक्षीस तुला!

**– किशोर गांधी**



जय बजरंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील २०२५–२६ या शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय यश संपादन केलेल्या इयत्ता दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# गुणवंत व संस्कारी विद्यार्थी घडवणे हेच जय बजरंग विद्यालयाचे उद्दिष्ट

## नरेंद्र फिरोदिया यांचे प्रतिपादन

नगर – गुणवंत व संस्कारी विद्यार्थी घडवणे हेच जय बजरंग विद्यालयाचे उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी केले. आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील २०२५–२६ या शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय यश संपादन केलेल्या इयत्ता दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास संस्थेचे सहसचिव उमेश गांधी, व्यवस्थापक आशुतोष घाणेकर, प्राचार्या सौ.पाठक मॅडम, प्राथमिक चे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व पालकांचे अभिनंदन करून या यशामागील सर्वांच्या परिश्रमांचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाच्या शिक्षिका सौ. मनीषा टेमकर यांनी केले.

# दुसऱ्यांच्या जीवनात सुखाचे दिवस आणणारे अर्थ सेवेचे कार्य प्रशंसनीय

## स्वामी गोविंदगिरी महाराज यांचे गौरवोद्गार; ॲविओथीक सर्विसेसच्या नव्या कार्यालयाचे उत्साहात उद्घाटन




ॲविओथीक सर्विसेस एलएलपी या आर्थिक सेवा संस्थेच्या नव्या कार्यालयाचे उद्घाटन करताना स्वामी गोविंदगिरी महाराज. समवेत मंदारबुवा रामदासी महाराज, हभप गोविंद जाटदेवळेकर महाराज, महापौर ज्योती गाडे, संचालक गणेश झंवर व प्रीतेश दुगड, श्रीनिवास झंवर, उद्योजक मोहन मानधना व नरेंद्र फिरोदिया आदी.

नगर – मनुष्य जीवनात अर्थाला खूप महत्व आहे. अर्थाने सगळं होतं असे नाही; पण अर्थ नसेलतर बरीच कामे अडतात. त्यामुळे अर्थाची उपेक्षा कोणीच कधीही करू नये. परिवार, समाज, राष्ट्र समृद्ध होण्यासाठी प्रत्येकाने लक्ष्मीची उपासना कायम करावी. आपल्या संस्कृती प्रमाणे सेवा हेच संस्कारांचे शिखर आहे. समाजाच्या सेवेच्या भावनेने आर्थिक क्षेत्रात योगदान देणारे गणेश झंवर व प्रीतेश दुगड यांचे काम कौतुकास्पद आहे. समाजात दुसऱ्याचे ओरबाडून खाण्याची वृत्ती निर्माण झालेली असताना सर्वसामन्यांची स्वतःची घरे व्हावी, त्यांचा व्यवसाय उभा राहावा यासाठी हे दोन युवक पुढे आली आहेत. दुसऱ्यांच्या जीवनात सुखाचे दिवस आणण्यासाठी होणारे अर्थ सेवेचे हे कार्य प्रशंसनीय असून ते अधिक बहरत जाओ. गणेश झंवर व प्रीतीश दुगड यांच्या सारखे युवक नगरमध्ये असल्याचे सद्भग्य नगरकरांचे आहे, असे गौरवोद्गार अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंदगिरी महाराजांनी केले.

अहिल्यानगर मधील ॲविओथीक सर्विसेस एलएलपी या आर्थिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या संस्थेच्या आनंदधाम जवळील नव्या कार्यालयाचे उद्घाटन स्वामी गोविंदगिरी महाराजांच्या हस्ते नुकतेच झाले.

यावेळी समर्थभक्त मंदारबुवा रामदासी महाराज, हभप गोविंद जाटदेवळेकर महाराज, महापौर ज्योती गाडे, ॲविओथीक सर्विसेसचे संचालक गणेश झंवर व प्रीतेश दुगड, श्रीनिवास झंवर, उद्योजक मोहन मानधना व नरेंद्र फिरोदिया, अमोल गाडे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात गणेश झंवर म्हणाले, नगरमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून उद्योग क्षेत्रात काम करताना लक्षात आले की, सर्वसामन्य नागरिकांना घरासाठी व व्यवसायासाठी बँकांकडून लहान मोठी कर्ज घेण्यासाठी मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी नागरिकांच्या वेळ व पैशाचे मोठ्याप्रमाणात अपव्यय होतो. यासाठी नागरिकांना पारदर्शीपणे सहकार्य करण्यासाठी ॲविओथीक सर्विसेस या आर्थिक संस्थेची स्थापना केली आहे. आज सर्वांच्या व महाराजांच्या आशीर्वादाने स्वतःच्या कार्यालयात या संस्थेचे स्थलांतर झाले आहे.

आभार मानताना प्रीतेश दुगड म्हणाले, प्रत्येकाला आपले स्वतःचे हक्काचे घर असावे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आमचा छोटासा प्रयत्न आहे. सर्वसामन्यांना सहज व पारदर्शीपणे कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी ॲविओथीक सर्विसेस या आर्थिक संस्था काम करत आहे. या कामास गुरूदेवांचा आशीर्वाद लाभल्याने हे काम केवळ नगर पुरते सीमित न ठेवता हळूहळू पूर्ण राज्यात व नंतर देशात न्यायचे आहे.



संत निरंकारी मिशनच्या वतीने बाबा हरदेवसिंहजी यांच्या स्मृतीतीत आयोजित समर्पण दिवससमागमात भाविकांना सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांनी मार्गदर्शन केले. समवेत निरंकारी राजपिता रमित जी.

# निरंकारी मिशनच्यावतीने बाबा हरदेवसिंहजींना श्रद्धासुमन अर्पण करित समर्पण दिवस साजरा

## मानव जीवनातील प्रत्येक क्षण मानवता आणि भक्तीभावासाठी समर्पित असावा : सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज

नगर – श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्मिक चेतनेने भारावलेल्या दिव्य वातावरणात संत निरंकारी मिशनतर्फे युगदृष्टा बाबा हरदेवसिंहजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा येथे भावपूर्ण संत समागमाचे आयोजन करण्यात आले. सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज तसेच निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सान्निध्यात पार पडलेल्या या समागमात देश–विदेशातील लाखो श्रद्धाळूंनी सहभागी होत सतगुरुंच्या अमृतमयी वचनांचा लाभ घेत आत्मिक शांती, आनंद आणि दिव्य प्रेरणेचा अनुभव घेतला.

यावेळी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी आपल्या आशीर्वचनांत सांगितले की, बाबा हरदेवसिंहजी यांचे संपूर्ण जीवन मानवता, सेवा आणि प्रेमाभक्तीचे जिवंत उदाहरण होते. मानवी जीवनातील प्रत्येक क्षण अर्थपूर्ण ठरावा आणि प्रत्येक कृतीतून करुणा, मानवता व सद्भावना प्रकट व्हावी, हीच त्यांची शिकवण होती. प्रत्येकाने आपल्या अंत:करणात मानवी मूल्ये जोपासून निराकाराच्या आधाराने उद्देशपूर्ण जीवन जगावे, असा संदेश त्यांनी दिला.

एखाद्याच्या आयुष्यात वेदना, दु:ख किंवा संघर्ष असेल, तर त्यात भर घालणे नव्हे, तर प्रेम, संवेदनशीलता आणि सहकार्याच्या माध्यमातून त्याला आधार देणे, हेच खरे मानवी कर्तव्य आहे, असे त्या म्हणाल्या. नात्यांमध्ये प्रेम, आपुलकी आणि समर्पणाची वीण अधिक दृढ करणारे जीवनच खऱ्या अर्थाने मानवतेचे दर्शन घडवते, असेही त्यांनी स्पष्ट केले. मंडळाच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने मिस्कीनरोड स्थित संत निरंकारी सत्संग भवन येथे छत्रपती संभाजीनगर येथील आ. कन्हैयालाल डेबरा यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्संगचा कार्यक्रम पार पडला यात अनेक वक्त्यांनी विचार, गीत, कवितांच्या माध्यमातून बाबाजींच्या प्रेरणादायी शिकवणुकिंचे स्मरण करित श्रद्धासुमन अर्पित केले. असेच सत्संग कार्यक्रम झोन ३६ अ मधील सर्व शाखां मध्ये उत्साहात, श्रद्धाभावाने पार पडले असल्याची माहिती झोनल इन्चार्ज हरिष खुबचंदानी यांनी दिली.

बाबा हरदेवसिंहजींची प्रेरणा आजही लाखो श्रद्धाळूंच्या हृदयात तेवढ्याच तेजाने जिवंत आहे. सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज त्यांच्या शिकवणीचा वारसा पुढे नेत सेवा, समर्पण आणि सद्भावनेचा प्रकाश जगभर पसरवत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मानवता, एकता आणि बंधुभावाचा संदेश सातत्याने समाजापर्यंत पोहोचत आहे.

# एसएससी बोर्ड परीक्षेत माहिनूर शेख विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण



नगर – एसएससी बोर्ड परीक्षेत माहिनूर शेख हिने ८८ टक्के गुण मिळवून विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.

माहिनूर शेख हिने प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पी ए इनामदार इंग्लिश स्कूल येथे पूर्ण केले. माहिनूर ही पत्रकार रियाज शेख यांची नात असून आदिल शेख यांची कन्या आहे.

माहिनूरने भविष्यात उच्च शिक्षण घेऊन समाजासाठी उपयुक्त कार्य करण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

# विदिशा वास्तू

सर्वासामान्यपणे कोणत्याही वास्तुत दिशा या 'समोरच्या' बाजूला तर उपदिशा या 'कोनात' असतात. दिशांमधे 'ऊर्जा' असते जी निर्गुण आहे, स्वयंभू आहे. तर उपदिशेत त्या ऊर्जेचे फळ 'शक्ती' स्वरुपात अनुभवता येते. शक्ती त्रिगुणात्मक आहे. उर्जे वर शक्तीचे संस्करण झाल्यावरच घटना घडते, जी पंचमहाभूतीय आहे

उपदिशेला दोन प्रकारच्या ऊर्जांची सरमिसळ योग्य स्वरुपात होण्यासाठी 'कोन' आवश्यक असतो, हा कोन उपदिशेला प्राप्त नाही झाला आणि उपदिशासमोर येवून उर्जादायी दिशांना जेव्हा हा कोन प्राप्त होतो तेव्हा वास्तुचे 'चुंबकीय' क्षेत्र विस्कटते. म्हणजेच शक्ति चे मुळ स्वरुप जाते, एकप्रकारे हिच स्वयंभू शक्ती परावलंबी होते म्हणजेच विघटीत पावते. विक्षेप देवता बलवान झाल्यामुळे अंगदेवतांच्या परिणामात गोंधळ प्राप्त होतो. म्हणजेच स्वयंभू असलेल्या उर्जेमधे घट येतेच. आवश्यक ऊर्जा अशा वास्तुत प्राप्त न झाल्यामुळे गोंधळ होतो. देवता समूह बिघडतो आणि या विपरित ऊर्जेच्या पिळाचा आयुष्यात एक प्रकारचा संघर्ष अनुभवायला येतो.

अशा वास्तुत ऊर्जाकोष आणि तत्वोदय याची सांगड मुलतः बिघडल्यामुळे 'विपरित अंतराळ' हा दोष तयार होतो. पत्रिकेत असो अथवा नसो पण एक प्रकारे 'कालसर्प' दोष आपल्या आणि आपल्या कुटुंबीयांच्या आयुष्यात तयार होतो.

वास्तुशास्त्रीय संस्कारांनी मात्र अशा वास्तुत अनुकूल परिणामकता आपण नक्कीच साधु शकतो जेणेकरून आपल्या गतिमान आयुष्यात सुद्धा सुसूत्रता लाभून समाधान आणि आनंद प्राप्त होईल.

**– कौस्तुभ काळे,** वास्तुवाचस्पति, अहमदनगर. मो. ९८५०९४१८८१



धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने भावपूर्ण आणि प्रेरणादायी अभिवादन कार्यक्रम पार पडला.

## सामाजिक बांधिलकीतून धर्मवीरांना मानाचा मुजरा

### अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशनचा जयंतीनिमित्त प्रेरणादायी सेवा उपक्रम

नगर - स्वराज्यासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने भावपूर्ण आणि प्रेरणादायी अभिवादन कार्यक्रम पार पडला. संभाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत त्यांच्या शौर्य, अदम्य जिद्द आणि धर्मरक्षणासाठी दिलेल्या सर्वोच्च बलिदानास अभिवादन करण्यात आले. घोषणांनी परिसर दुमदुमून गेला आणि प्रत्येकाच्या हृदयात अभिमानाची ज्योत प्रज्वलित झाली.

इतिहासाला वंदन करतानाच समाजसेवेची परंपरा जपत, कार्यक्रमासाठी उपस्थितांना फाउंडेशनच्या वतीने चहा वाटप करण्यात आले.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक निखिलदादा वारे फाउंडेशनचे ट्रस्ट मेंबर संदीप नवसुपे, मनोज सोनवणे, जिल्हाध्यक्ष अशोक गाडे, निलेश सुंबे, दरेकर काका, शशिकांत भांबरे, संजय शिंदे, श्रीपाद दगडे, भाग्येश सव्वाशे, सिद्धार्थ पानसरे, बालाजी काळे, भरत सुंबे, अभय शेडगे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# 'आंतरजिल्हा फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धे'साठी अहिल्यानगर ज्युनियर बॉईज संघ धुळे येथे रवाना



### थेट उपांत्यपूर्व फेरीत दाखल; शनिवारी सातारा व छत्रपती संभाजीनगर विरुद्ध सामना

नगर - अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन (ADFA) यांच्या मान्यतेने अहिल्यानगर ज्युनियर बॉईज (अंडर-१५) फुटबॉल संघ हा WIFA आंतरजिल्हा फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२६ (ज्युनियर बॉईज) मध्ये सहभागी होणार आहे. ही स्पर्धा १२ ते १८ मे दरम्यान शिरपूर, जि. धुळे येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी १५ मे रोजी संघ रवाना झाला आहे.

गतवर्षीच्या स्पर्धेत अहिल्यानगर संघाने उल्लेखनीय कामगिरी करत चौथे स्थान पटकावले होते. त्याच कामगिरीच्या जोरावर यावर्षी संघ थेट उपांत्यपूर्व (क्वार्टर फायनल) फेरीतून आपल्या मोहिमेची सुरुवात करणार आहे. अहिल्यानगर संघाचा सामना १६ मे रोजी सातारा व छत्रपती संभाजीनगर जिल्हा यांच्यातील विजेत्या संघाविरुद्ध होणार आहे.

या स्पर्धेसाठी निवड झालेल्या संघाचे अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, अमरजीतसिंग शाही, सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव व व्हिक्टर जोसेफ, खजिनदार रिशपाल सिंग परमार, सह खजिनदार रणबीर सिंग परमार तसेच कोअर कमिटी सदस्य राजू पाटोळे यांनी अभिनंदन करून संघास पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

संघाचे प्रशिक्षक जोनाथन जोसेफ तर संघ व्यवस्थापक जेव्हिअर स्वामी हे जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संघ उत्कृष्ट कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनतर्फे संपूर्ण संघाला स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

अहिल्यानगर ज्युनियर बॉईज (अंडर-१५) फुटबॉल संघ पुढीलप्रमाणे - अशोक चंद (कर्णधार), यदुवर कोकरे (उपकर्णधार), माहीर गुंदेचा, सौरभ खंडेलवाल, चिराग गोरे, ओम गाडे, ओम लोखंडे, इंद्रजित गायकवाड, कृष्णा भिसे, हर्षद सोनावणे, भार्गव पिंपळे, जय मुथा, गुणाध्य जाधव, आयुष गाडळकर, आदर्श साबळे, अंशुमन विधाते, देवांश झरेकर, मोक्ष गरदास, वीरेंद्र वीर, जोएल साठे.

# निमगाव वाघा येथे १६ मे रोजी ग्रामीण मराठी साहित्य संमेलन

### स्वागताध्यक्षपदी माधवराव लामखडे, गौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ॲड. कृष्णा झावरे





नगर - छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे १६ मे रोजी आयोजित करण्यात आलेल्या सहाव्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी उद्योजक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच प्रज्ञावंत व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या गौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा पंडितराव झावरे यांची निवड करण्यात आल्याची माहिती संमेलनाचे मुख्य संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने परिवार मंगल कार्यालय, निमगाव वाघा येथे या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील साहित्य, संस्कृती, लोकपरंपरा आणि समाजप्रबोधनाचा वारसा जपण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनात राज्यभरातील साहित्यिक, कवी, समाजप्रबोधक, अभ्यासकांची उपस्थिती लाभणार आहे.

ग्रामीण साहित्याला व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, नवोदित लेखक-कवींना प्रोत्साहन देणे तसेच समाजामध्ये वैचारिक जागृती निर्माण करणे हा या साहित्य संमेलनाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. संमेलनात विविध साहित्यिक परिसंवाद, विचारमंथन सत्रे, सामाजिक विषयांवरील चर्चासत्रे आणि काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील अनेक नामांकित कवी व कवयित्री आपल्या कविता सादर करणार असून ग्रामीण संस्कृतीचा ठेवा जपणाऱ्या लोककला आणि साहित्य प्रकारांनाही विशेष स्थान देण्यात आले आहे.

यावेळी छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित पोवाडे, अभंग, प्रेरणादायी कविता आणि सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे त्यांच्या विचारांना अभिवादन करण्यात येणार आहे. समाजप्रबोधन, राष्ट्रभक्ती, स्त्रीशक्ती आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या या महामानवांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या संमेलनातून करण्यात येणार आहे.

माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे हे कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळींना सातत्याने पाठबळ देत असतात. ग्रामीण भागातील सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला असून यापूर्वीही त्यांनी विविध ग्रामीण काव्य व साहित्य संमेलनांमध्ये महत्त्वपूर्ण पदे भूषविली आहेत. साहित्य आणि समाजकार्याविषयी विशेष आवड असलेल्या लामखडे यांच्या नियुक्तीमुळे संमेलनाच्या आयोजनाला अधिक बळ मिळणार असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली.

अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा पंडितराव झावरे हे कायदे क्षेत्राबरोबरच सामाजिक चळवळींमध्येही सक्रिय योगदान देत आहेत. गरजू आणि वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी ते सातत्याने कार्यरत असतात. त्यांच्या सामाजिक बांधिलकीची दखल घेऊन प्रज्ञावंत आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय सामाजिक योगदान देणाऱ्यांच्या गौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी त्यांची निवड करण्यात आली आहे.

# डॉक्टर रवींद्र कुटे यांच्यावर कारवाई करावी : आयएमए

### पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना पाठीशी घालणार नाही; शिस्तभंगाची प्रक्रिया

नगर - पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (आयएमए) माजी राज्याध्यक्ष डॉ. रवींद्र कुटे यांना पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावली आहे. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर आयएमएने आपली अधिकृत भूमिका स्पष्ट करत संबंधित प्रकरणात कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी केली आहे.

आयएमएने स्पष्ट केले आहे की, पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही सदस्याचे किंवा पदाधिकाऱ्याचे समर्थन संघटना करणार नाही. डॉ. रवींद्र कुटे यांच्या प्रकरणात पोलिस आणि न्यायालय पुराव्यांच्या आधारे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करतीलच, मात्र संघटनेनेही या घटनेची गंभीर दखल घेतली आहे.

आयएमएच्या घटनेनुसार आणि शिस्तीच्या नियमांनुसार योग्य ती कारवाई करण्यासाठी अहिल्यानगर शाखेने डॉ. कुटे यांच्याविरोधातील शिस्तभंग कारवाईचा प्रस्ताव तात्काळ राष्ट्रीय अध्यक्षांकडे पाठविला आहे. संघटनेच्या प्रतिमेला धक्का पोहोचविणाऱ्या व्यक्तींवर नियमांनुसार कठोर कारवाई केली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, अहिल्यानगर आयएमएने महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य विभागासोबत खांद्याला खांदा लावून पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि 'बेटी बचाओ'सारख्या जनजागृती मोहिमांमध्ये सातत्याने सक्रिय सहभाग घेतल्याचे नमूद केले. ही सामाजिक बांधिलकी भविष्यातही कायम राहणार असल्याचे संघटनेने सांगितले. संघटना कोणत्याही व्यक्तीपेक्षा मोठी आहे. कायद्याचे उल्लंघन झाल्यास न्यायालयीन तसेच संघटनात्मक कारवाई होणे आवश्यक आहे. याबाबत आयएमएचे कोणतेही दुमत नाही, असे निवेदनात म्हटले आहे, अशी माहिती आयएमएचे अध्यक्ष डॉ. चंद्रदत्त मिश्रा आणि सचिव डॉ. मुकुंद तांदळे यांनी दिली.

# शनि जयंतीनिमित्त माळीवाडा पंच मंडळ देवस्थान ट्रस्टतर्फे १६ मे रोजी शनि मारुती मंदिर येथे विविध धार्मिक कार्यक्रम



नगर - शनि जयंती, अमावस्या आणि शनिवार असा दुर्मिळ व अत्यंत पवित्र योग यंदा एकाच दिवशी येत असल्याने शहरातील माळीवाडा येथील शनि मारुती मंदिर परिसरात माळीवाडा पंच मंडळ देवस्थान ट्रस्टच्या वतीने १६ मे रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

शनि जयंतीच्या निमित्ताने मंदिर परिसराची आकर्षक रंगरंगोटी करण्यात आली असून मंदिरावर विद्युत रोषणाई करून संपूर्ण परिसर उजळून निघाला आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन ट्रस्टच्या वतीने मंडप उभारण्यात येणार आहे. तसेच उन्हाची तीव्रता लक्षात घेता भाविकांसाठी थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली असून मंदिर परिसरात यासाठी विशेष मॅटची व्यवस्था करण्यात आली आहे. ट्रस्टच्या या नियोजनाचे भाविकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

या पवित्र दिनानिमित्त १६ मे रोजी पहाटे ५ वाजता अभिषेकाने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. सकाळी ६ वाजता आरती व त्यानंतर प्रसाद वाटप करण्यात येणार आहे. दुपारी १२ वाजता महाआरती तर सायंकाळी ७ वाजता सायंआरती आयोजित करण्यात आली आहे. याशिवाय दिवसभर भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती देवस्थान ट्रस्टच्या वतीने देण्यात आली.

या धार्मिक कार्यक्रमांचे पौराहित्य गुरुजी आनंद पांडे हे करणार आहे.

हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त पांडुरंग नन्नवरे, विजय कोथिंबीरे, रंगनाथ फुलसौंदर, ज्ञानेश्वर रासकर, हरिश्चंद्र गिरमे, चंद्रकांत फुलारी, बापूसाहेब एकाडे, प्रा. माणिकराव विधाते, संजय चाफे, नितीन पुंड आदी पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

शनि जयंती, अमावस्या आणि शनिवार या त्रिवेणी योगाचे धार्मिक दृष्ट्या विशेष महत्त्व असल्याने भाविकांनी उपस्थित राहून दर्शन, धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन माळीवाडा पंच मंडळ देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'ऑनलाईन' निकालाचा गोंधळ आणि उन्हातील 'विद्यार्थी शोध' मोहिमेने शिक्षकांचा जीव धोक्यात

### शिक्षक भारतीचा शासनाला आंदोलनाचा इशारा



महेश पडेकर

नगर - शिक्षण विभागाने १० वी आणि १२ वीचे ऑनलाईन निकाल जाहीर करून कौतुक मिळवले असले, तरी प्रत्यक्षात मूळ गुणपत्रके (ऑफलाईन रिझल्ट) न मिळाल्याने राज्यभरात प्रवेश प्रक्रियेचा बोजवारा उडाला आहे. दुसरीकडे, तीव्र उष्णतेच्या लाटेत शिक्षकांना 'विद्यार्थी शोध मोहिमे'साठी सक्तीने रस्त्यावर उतरवले जात असल्याने शिक्षकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, शिक्षक भारती संघटनेने मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांना कायदेशीर निवेदन देऊन प्रशासकीय धोरणांचा जाहीर निषेध केला आहे.

ऑनलाईन निकाल जाहीर होऊनही विद्यार्थ्यांना अद्याप शाळा सोडल्याचे दाखले (LC) आणि मूळ गुणपत्रके मिळालेली नाहीत. यामुळे महाविद्यालयीन प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे अपलोड करताना तांत्रिक अडचणी येत आहेत. मूळ कागदपत्रांच्या पडताळणीशिवाय प्रवेश निश्चित होऊ शकत नाही, तरीही प्रवेश प्रक्रिया रेटली जात असल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. जोपर्यंत ऑफलाईन निकाल मिळत नाही, तोपर्यंत प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रिया सुरू करू नये, अशी मागणी संघटनेने केली आहे.

## उष्णतेची लाट आणि 'मृत्यूचा सापळा'

शाळांची पटसंख्या टिकवण्यासाठी शिक्षकांना ऐन उन्हात 'विद्यार्थी शोध मोहिमे'साठी बाहेर पाठवले जात आहे. मद्रावती येथे याच मोहिमेदरम्यान आदर्श शिक्षक राजू हिवंज यांचा उष्माघाताने झालेला मृत्यू आणि मुंबईत 'बीएलओ' कर्तव्यावर असताना अनेक शिक्षक आयसीयूमध्ये दाखल होण्याची घटना समोर आली आहे. प्रतिकूल हवामानात अशा कामांची सक्ती करणे हे मानवी हक्कांचे आणि कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

शिक्षक भारती संघटनेचे पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर यांनी ईमेल द्वारे मुख्यमंत्री शिक्षण मंत्री शिक्षण आयुक्त शिक्षण संचालक जिल्हाधिकारी यांना खालील निवेदनात मागण्या करण्यात आल्या विमा संरक्षण: निवडणूक, जनगणना किंवा शैक्षणिक मोहिमेवर असताना अपघात किंवा मृत्यू झाल्यास संबंधित शिक्षकाच्या कुटुंबाला ५० लाख रुपयांचे विमा कवच व वारसाला शासकीय नोकरी द्यावी.

## वैद्यकीय खर्च

कर्तव्यावर असताना आजारी पडणाऱ्या शिक्षकांचा १००% वैद्यकीय खर्च शासनाने उचलणे कायदेशीररित्या बंधनकारक करावे.

## सक्ती थांबवा

उष्णतेच्या लाटेचा विचार करून शिक्षकांना फिल्ड वर्कची सक्ती करू नये. या मागणीला आमदार कपिल पाटील, राज्य अध्यक्ष अशोक बेलसरे, कार्याध्यक्ष सुभाष मोरे, विनाअनुदान कृती समिती राज्याध्यक्ष जयवंत भाबड, सचिव सुनील गाडगे, विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, महिला अध्यक्ष रुपालीताई बोरुडे, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे, प्रवीण काळे, सहसचिव राहुल कानवडे, तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, साई थोरात, संपत वाळके, दिगंबर देसाई, सचिव वंदना जाधव, कल्पना चौधरी, मफीज इनामदार, दीपक फापाळे, गणपत धुमाळ, विजय पांडे, अमोल तळेकर, संतोष नवले, बाबासाहेब तांबे, अकील फकीर, बाबाजी लाळगे, वैभव चोथे, प्रवीण मालुंजकर, श्याम जगताप आदींनी पाठिंबा दिला.

## ...तर न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्यात येईल

शिक्षण विभागाने केवळ निकालाची घाई केली, पण त्यापुढील प्रवेशाच्या तांत्रिक बाबींकडे दुर्लक्ष केले आहे. उन्हात शिक्षकांचे बळी जात असताना प्रशासन सुस्त आहे. जर यावर तातडीने कायदेशीर तोडगा निघाला नाही, तर मानवी हक्क आयोग आणि न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्यात येईल, असा इशारा महेश पाडेकर यांनी दिला आहे.

# इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मोफत पूर्वतयारी प्रशिक्षण; ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

नगर - राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठीच्या स्पर्धात्मक परीक्षांसाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने महाज्योतीमार्फत जेईई, नीट आणि एमएचटी-सीईटी २०२६-२८ बॅचसाठी मोफत ऑनलाइन पूर्वतयारी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांनी महाज्योतीच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक विनोद लोंढे यांनी केले आहे.

महाज्योतीमार्फत विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने दर्जेदार प्रशिक्षण दिले जाणार असून टॅबही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या प्रशिक्षणासाठी विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. संबंधित विद्यार्थी इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्गातील असावा. विद्यार्थी इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा. तसेच विद्यार्थ्याने विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेला असावा. विद्यार्थी हा नॉन क्रिमिलेअर उत्पन्न गटातील असावा. विद्यार्थ्यांची निवड इयत्ता दहावीतील गुणांची टक्केवारी, सामाजिक प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणानुसार करण्यात येणार आहे.

अर्ज करण्यासाठी आधार कार्ड, रहिवासी दाखला, जातीचे प्रमाणपत्र, वैध नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, इयत्ता दहावीची गुणपत्रिका, दिव्यांग असल्यास संबंधित प्रमाणपत्र तसेच अनाथ असल्यास त्याबाबतचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. विद्यार्थ्यांनी महाज्योतीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करावेत. अर्जासोबत सर्व कागदपत्रे स्वसाक्षांकित करून स्पष्ट दिसतील अशा पद्धतीने स्कॅन करून जोडावीत, असेही कळविण्यात आले आहे.

# अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाच्यावतीने अधिक मासानिमित्त ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयाग

नगर - अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघ संचलित महर्षी वेद विद्यालय च्या वतीने अधिक मासानिमित्त ऋग्वेद भुवन, चितळे रोड येथे १८ ते २२ मे दरम्यान ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयागाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक विधीत वेदघोष, मंत्रोच्चार, हवन व विविध वैदिक कार्यक्रम होणार आहेत. २२ मे रोजी दुपारी साडेबारा वाजता पूर्णाहुती करून महाप्रसादाने सांगता होईल.

या यागामध्ये सहभागी होण्यासाठी व यजमान म्हणून बसण्यासाठी भाविकांनी ९७६३०३२०३१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या धार्मिक कार्यक्रमास भाविकांनी उपस्थित रहावे, असेही आयोजकांतर्फे सांगण्यात आले.

# रयत शिक्षण संस्थेत उत्तर विभागाला विशेष प्रतिनिधीत्वाची संधी

### नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे उत्तर विभागीय कार्यालय व माध्यमिक शिक्षक संघाकडून स्वागत

नगर - आशिया खंडातील सर्वात मोठ्या रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांची पुन्हा एकदा निवड करण्यात आल्याचे व उत्तर विभागाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे उत्तर विभागीय कार्यालय व माध्यमिक शिक्षक संघाकडून स्वागत करण्यात आले आहे. तर उत्तर विभागाला विशेष प्रतिनिधीत्वाची संधी मिळाली असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे.

शिक्षणाची गंगा बहुजनांच्या घराघरात पोहोचविणाऱ्या रयत शिक्षण संस्थेच्या संस्थेच्या उपाध्यक्षपदी अरूण पुंजाजी कडू-पाटील आणि सचिवपदी विकास विश्वासराव देशमुख यांची फेरनिवड करण्यात आली आहे. यासोबतच रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागातून मॅनेजिंग कौन्सिल सदस्य म्हणून ॲड. भगीरथ निवृत्ती शिंदे, श्रीमती मीनाताई माणिकराव जगधने, बाबासाहेब सहादू भोस, संदिप गोरखनाथ वर्पे, सुरेश विठ्ठलराव बोळीज, प्रिं. डॉ. नानासाहेब सूर्यभान गायकवाड, राजेंद्र खंडेराव चांदे यांची निवड झाली आहे.

शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नूतन पदाधिकाऱ्यांच्या कार्यकुशलतेमुळे संस्थेची शैक्षणिक, सामाजिक आणि संघटनात्मक प्रगती अधिक वेगाने होईल, अशी भावना विभागीय अध्यक्ष आशुतोष काळे व विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे यांनी व्यक्त केली आहे.

या निवडीबद्दल अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी नूतन कार्यकारिणीचे विशेष अभिनंदन केले आहे.

उत्तर विभागातील सर्व जनरल बॉडी सदस्य, लाइफ वर्कर, लाइफ मेंबर, शिक्षक, मुख्याध्यापक आणि रयत हितचिंतकांनी या निवडीचे स्वागत करून नूतन पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## काय सांगताय? रोबो खाता येणार?

रोबो तुमच्यासाठी स्वयंपाक करू शकतो किंवा तुम्हाला जेवण भरवू शकतो, हे तुम्ही ऐकले असेल. पण, तुम्हाला माहीत आहे का, की आता चक्क रोबोच खाता येऊ शकतो? हे एक खाद्य रोबोटिक तंत्रज्ञान आहे, जे पूर्णपणे खाण्यायोग्य आहे. रोबोसोबत त्याची बॅटरी देखील खाता येते. स्विस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या वैज्ञानिकांनी एक असा रोबो तयार केला आहे, जो पूर्णपणे खाण्यायोग्य आहे. या रोबोला गिळता किंवा चघळता देखील येते.

हा रोबो प्रामुख्याने रानडुकरासारख्या प्राण्यांना औषधे किंवा पोषण देण्यासाठी डिझाईन करण्यात आला आहे; पण तो माणसाला खाताही येऊ शकतो. रोबोटिक्सच्या क्षेत्रात ही एक मोठी उपलब्धी आहे. कारण, आतापर्यंत कोणताही रोबो पूर्णपणे खाण्यायोग्य नव्हता. रोबोमधील बॅटरी आणि मोटरसारखे भाग विषारी असायचे. तथापि, या रोबोची बॅटरीदेखील खाण्यायोग्य आहे. खाद्य रोबोमधील मोठी आव्हाने आता पार करण्यात आली आहेत. वैज्ञानिकांसमोर सर्वात मोठे आव्हान हे होते की, प्लास्टिक आणि धातूचा वापर न करता ते कसे बनवायचे. मऊ आणि खाण्यायोग्य ॲक्च्युएटर चालवण्यासाठी गॅस प्रेशरची आवश्यकता असते. त्यासाठी पंप आणि वाल्व्हची गरज असते, जे प्लास्टिक आणि धातूशिवाय बनवणे कठीण होते. एझक्रूड (स्वित्झलँड) मधील दारियो फ्लोरानो



यांच्या इंटेलिजेंट सिस्टम्स लॅबोरेटरीच्या संशोधकांनी एक नवीन पेपर प्रकाशित केला, ज्यात त्यांनी बॅटरी आणि ॲक्च्युएटर या दोन्हीच्या खाता येणां ?या आवृत्त्या दर्शविल्या आहेत. या रोबोचा एक संभाव्य उपयोग म्हणजे रानडुकरासारख्या पकडण्यास कठीण असलेल्या प्राण्यांना पोषण किंवा औषधे देणे.

रानडुक्कर जिवंत, हलणाऱ्या शिकारीकडे आकर्षित होतात. याचा अर्थ असा की, रोबोमध्ये स्वाईन फ्लू लससारखी कोणतीही गोष्ट ठेवून त्याला खाऊ घातले जाऊ शकते. या रोबोचे फायदे असे : तो बनवण्यासाठी स्वस्त आहे. तो पूर्णपणे बायोडिग्रेडेबल आहे. तो हालचाल करीत असल्यामुळे प्राणी आकर्षित होतात. याचा वापर अशा प्राण्यांपर्यंत पोहोचण्यासाठी केला जाऊ शकतो, जिथे मानवांना जाणे शक्य नसते. रोबोची बॅटरी जिलेटिन आणि मेणापासून बनवलेली आहे. ती साइट्रिक ॲसिड आणि बेकिंग सोडा असलेल्या कप्प्यांमध्ये रासायनिक ऊर्जा साठवते.

हे दोन्ही पदार्थ खाण्यायोग्य आहेत. साईट्रिक ॲसिडला एका पडद्याद्वारे बेकिंग सोड्यापासून वेगळे ठेवले जाते. ॲसिड असलेल्या कप्प्यावर दाब दिल्यावर तो फाटतो. त्यामुळे ॲसिड हळूहळू बेकिंग सोड्यावर थेंब थेंब पडते, ज्यामुळे बॅटरी सक्रिय होते आणि कार्बन डायऑक्साईड गॅस तयार करू लागते. (सोबतच सोडियम सायट्रेट देखील तयार होते, जे अनेक खाद्यपदार्थांमध्ये आढळते.) कार्बन डायऑक्साईड गॅस जिलेटिनच्या नळ्यांमधून ॲक्च्युएटर पर्यंत जातो. ॲक्च्युएटरमध्ये वरच्या बाजूला गॅसचे कप्पे आणि खाली एक कडक बेस असतो. कप्प्यांमध्ये दाब पडल्याने बेस वाकतो आणि रोबोची एकदाची हालचाल पूर्ण होते.

सतत हालचाल करण्यासाठी गॅस वारंवार सोडला जाणे आवश्यक आहे. हे काम करण्यासाठी खाण्यायोग्य वाल्व्हचा वापर करण्यात आला आहे. हा वाल्व्ह 'स्नॅप-बकलिंग' च्या तत्त्वावर कार्य करतो, म्हणजेच तो आपल्या बंद स्थितीत सर्वाधिक स्थिर असतो; परंतु त्यावर दाब दिल्यास तो वेगाने उघडतो आणि दाब कमी झाल्यावर पुन्हा बंद होतो. अशा प्रकारे, एक खाण्यायोग्य बॅटरी, एक वाल्व्ह आणि एक ॲक्च्युएटर एकत्र येऊन एक खाण्यायोग्य रोबो तयार करतात.

## जगातील सर्वात विषारी पदार्थ

जगभरात वेगवेगळ्या प्रकारचे अन्न खाल्ले जाते. काही ठिकाणचे पदार्थ पाहून तर आपण थक्क होऊन जातो. चीनसारख्या देशात तर साप, बेडूकही खाल्ला जातो. मात्र, या जगात काही पदार्थ असे आहेत, ज्यात विष असते. म्हणजेच हे पदार्थ खाताना तुम्ही चूक केली तर तुमचा कदाचित जीवही जाऊ शकतो, असे सांगितले जाते. जगात असाच एक सर्वात विषारी पदार्थ आहे. हा पदार्थ काही मोजकेच लोक तयार करू शकतात. या पदार्थाला योग्य पद्धतीने तयार न केल्यास पुढच्याच काही मिनिटात व्यक्तीचा मृत्यू होऊ शकतो. कॅनडामधील इन्स्टिट्यूट ऑफ फूड सेफ्टीच्या रिपोर्टनुसार जपानमध्ये फुगू नावाचा एक मासा आहे. या माशापासून बनवलेला खाद्यपदार्थ सर्वाधिक विषारी मानला जातो.

या फुगू माशाला 'पफरफिश'ही म्हटले जाते. या माशामध्ये टेट्रोडोटॉक्सिन नावाचा घटक आढळतो. फुगू या माशाचे अंडाशय, आतडे, फुफ्फुस यामध्ये टेट्रोडोटॉक्सिन हा घटक सर्वाधिक आढळतो. टेट्रोडोटॉक्सिन हा घटक न्युरोटॉक्झिन आहे. हा घटक सायनाईडपेक्षाही विषारी असल्याचे बोलले जाते. त्यामुळेच एका फुगू माशामुळे तब्बल ३० लोकांचा मृत्यू होऊ शकतो, असे म्हटले जाते. फुगू हा मासा विषारी असला तरीदेखील जपानमध्ये त्याचा आहारात समावेश केला जातो. मात्र, या माशापासून प्रत्येकालाच खाद्यपदार्थ तयार करता येत नाहीत. त्यासाठी जपानी शेफला ट्रेनिंग दिले जाते.

जपानमधील अनेक रेस्टॉरंटस्मध्ये फुगू डिश दिले जाते. मात्र, हे डिश तयार करण्याची परवानगी फक्त कुशल व परवानाधारक शेफनाच असते. फुगू डिशला



योग्य पद्धतीने न तयार केल्यास ते खाणाऱ्याचा मृत्यूदेखील होऊ शकतो. चुकीच्या पद्धतीने बनवलेल्या फुगू डिशमुळे मृत्यू झाल्याच्या अनेक घटना समोर आलेल्या आहेत. दरम्यान, या फुगू डिशची किंमतही खूपच जास्त असते. या एका फुगू डिशची किंमत ३५०० ते २०००० हजार रुपये असते. अनुभवी शेफच्या मदतीनेच हे डिश तयार केले जाते, त्यामुळेच त्याची किंमत जास्त असते. जपानमध्ये काही प्रीमियम रेस्टॉरंटस्मध्ये फुगू डिशची किंमत ३५ हजार रुपयांच्या घरात आहे. फुगू डिश अत्यंत स्वादिष्ट असते, त्यामुळेच अनेक लोक हे डिश खाणे धोका पत्करूनही पसंद करतात!

## चॅट जीपीटी सापडला वादाच्या भोवऱ्यात

ओपन एआयच्या चॅट जीपीटी या लोकप्रिय चॅटबॉटवर अमेरिकेत अनेक कुटुंबांनी कायदेशीर आव्हान उभे केले आहे. चॅटबॉटने आत्महत्या प्रशिक्षक (सुसाईड कोच) म्हणून काम केल्यामुळे लोकांचे मानसिक आरोग्य बिघडले आणि काही जणांनी आत्महत्या केल्याचा आरोप या कुटुंबांनी केला आहे.कॅलिफोर्नियामध्ये सात (७) स्वतंत्र खटले दाखल करण्यात आले आहेत, ज्यात ओपन एआयच्या चॅट जीपीटीवर सदोष मृत्यू (रॉंगफुल डेथ), आत्महत्येस मदत (असिस्टेड सुसाईड), अनैच्छिक मनुष्यवध (इव्हॉल्युटरी मॅनस्लाउटर), निष्काळजीपणा (निग्लिजन्स) आणि उत्पादन दायित्व (प्रॉडक्ट लायबिलिटी) यांसारखे गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

**खटल्यांमधील मुख्य आरोप**

**मानसिक फेरफार(सायकॉलॉजिकल मॅन्युप्युलेशन):**

फिर्यादींच्या म्हणण्यानुसार, सुरुवातीला वापरकर्ते शालेय काम, संशोधन किंवा पाककृतींसाठी चॅट जीपीटीचा वापर करत होते. मात्र, कालांतराने चॅटबॉट मानसिकरीत्या फेरफार




करणारे बनले आणि स्वतःला विश्वासू आणि भावनिक आधार (कॉन्फिडंट अँड इमोशनल सपोर्ट) देणारे म्हणून सादर करू लागले.

**हानिकारक विचारांना प्रोत्साहन :**

गरज असताना व्यावसायिक मदत (प्रोफेशनल हेल्प) देत मार्गदर्शन करण्याऐवजी, चॅट जीपीटीने हानिकारक भ्रम (हार्मफूल डेल्युशन) वाढवले आणि काही प्रकरणांमध्ये आत्महत्या प्रशिक्षक म्हणून काम केले.

झैन शांबलीन प्रकरण :

टेक्सासमधील २३ वर्षीय झैन शांबलीन या तरुणाने जुलैमध्ये आत्महत्या केली. त्याच्या कुटुंबाचा आरोप आहे की, मृत्यूच्या चार तास आधी झालेल्या संवादात चॅट जीपीटीने वारंवार आत्महत्येचे उदात्तीकरण केले, तू तुझा निर्णय घेतल्याने आणि योजना पूर्ण केल्याने तू मजबूत आहेस असे सांगितले आणि तो तयार आहेस का असे सतत विचारले. चॅटबॉटने कथितरीत्या शांबलीनच्या सुसाईड नोटची प्रशंसा केली आणि त्याचा लहानपणीचा कुत्रा पलीकडच्या जगात त्याची वाट पाहत असेल, असे सांगितले.

**जीपीटी-४ ओ च्या तातडीच्या लॉंचिंगचा आरोप :**

फिर्यादींनी आरोप केला आहे की, ओपन एआने त्यांचे जीपीटी-४ओ हे मॉडेल पुरेशा सुरक्षा चाचण्यांशिवाय बाजारात घाईघाईत आणले. अंतर्गत इशाऱ्यांनंतरही कंपनीने वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेपेक्षा वापरकर्ता प्रतिबद्धतेला (युजर एंगेजमेंट ओव्हर युजर सेफ्टी) प्राधान्य दिले.

मागण्या आणि ओपन एआयची प्रतिक्रिया

फिर्यादींनी नुकसान भरपाईसोबतच उत्पादनामध्ये बदल करण्याची मागणी केली आहे, ज्यात वापरकर्त्यांनी आत्मघाती विचार व्यक्त केल्यास आपत्कालीन संपर्कांना (इमजन्सी कॉन्टॅक्ट) सूचना देणे अनिवार्य करणे, आत्म-नुकसान किंवा आत्महत्येच्या पद्धतींचा समावेश असलेले संवाद आपोआप समाप्त करणे.अतिरिक्त सुरक्षा उपाययोजना लागू करणे.

**ओपन एआयचे म्हणणे**

ओपन एआयच्या प्रवक्त्याने ही परिस्थिती अतिशय हृदयद्रावक असल्याचे सांगून, दाखल झालेल्या खटल्यांचा आढावा घेत असल्याचे स्पष्ट केले आहे. प्रवक्त्याने सांगितले की, 'आम्ही एआयला मानसिक किंवा भावनिक तणावाची चिन्हे ओळखण्यासाठी आणि संवादाला शांत करून लोकांना वास्तविक जगातील मदतीकडे मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षित करतो. मानसिक आरोग्य चिकित्सकांशी जवळून काम करून आम्ही संवेदनशील क्षणांमध्ये चॅट जीपीटीचे प्रतिसाद सुधारत आहोत.

## ६२ वर्षांपासून झोपलाच नाही!

या जगात निसर्गाच्या नियमांनाही अपवाद ठरणारे काही लोक आहेत. गिरीबाला किंवा प्रल्हाद जानी यांच्यासारखे काही लोक ५०-६० वर्षे काहीही न खातापिता जिवंत राहिले, इतकेच नव्हे तर दैनंदिन आयुष्यात चांगले सक्रियही होते. काही लोक केवळ चहा घेऊन किंवा तत्सम माफक अन्न-पाणी घेऊनही अनेक वर्षे राहिलेले आढळून येतात. केवळ आहाराबाबतच असे अपवाद आहेत असे नाही. व्हिएतनाममध्ये एक शेतकरी असा आहे, जो गेली ६२ वर्षे झोपलेलाच नाही!

सर्वांसाठी झोप ही किती महत्त्वाची असते हे आपल्या सर्वांनाच माहीत आहे. जर झोप पूर्ण झाली नाही तर अनेक आजारांना आमंत्रण मिळतं. एक दिवसही झोप पूर्ण झाली नाही तर लगेच शरीराच्या तक्रारी, त्रास सुरू होतात, काम करणे सुचत नाही. अन्न-पाण्यासारखंच झोपही तेवढीच महत्त्वाची आहे, पण हा माणूस तब्बल ६२ वर्षे झोपलेला नाही. त्याची ही अडचण पाहून डॉक्टरही थक्क झाले होते. शास्त्रज्ञांच्या मते, माणसांसाठी श्वास घेण्याइतकीच झोपही महत्त्वाची



असते. पण या माणसाच्या बाबतीत सगळंच उलट घडलं आहे.

हा एक शेतकरी असून, त्याचे नाव थाई न्गोक आहे आणि तो आता ८१ वर्षांचा आहे. त्याच्या न झोपण्यामागचे कारणही फार विचित्र आहे. हे कारण म्हणजे न्गोक यांना आलेला ताप. त्यांनी दावा केला आहे की, १९६२ मध्ये त्यांना तीव्र ताप आला होता. तेव्हापासून ते झोपलेले नाहीत. ते डुलकीही घेत नाहीत किंवा गाढ झोप घेत नाहीत. न्गोक गेल्या ६० ते ६२ वर्षांपासून केवळ जागेच नाहीत तर त्यांच्या शेतातही काम करत आहे. त्यांना कधीही कोणीही झोपलेलं कधीच पाहिलेलं नाही. याबाबत त्यांची पत्नी, मुले, मित्र तसेच त्यांच्या शेजाऱ्यांनी पुष्टी दिली आहे. दरम्यान, त्यांच्या दुर्मीळ आजारामुळे डॉक्टर गोंधळलेले आहेत.

वृत्तानुसार, व्हिएतनाममधील क्वांग नाम प्रांतातील एका छोट्या गावात १९४२ मध्ये जन्मलेला न्गोक व्हिएतनाम युद्धादरम्यान वयाच्या २० व्या वर्षी ते तीव्र तापाने आजारी पडले होते. काही दिवसांनी त्याचा ताप कमी झाला, पण त्याला पुन्हा झोप मात्र लागली नाही. न्गोकने म्हटलं की, त्यांनी झोप येण्यासाठी खूप प्रयत्न केले, पण त्याला झोप आली नाही. त्याने म्हटलं की, 'झोपण्यासाठी मी औषध घेतलं, घरगुती उपचार करून पाहिले, झोपण्यासाठी चक्क दारूही प्यायलो, पण काहीही उपयोग झाला नाही.' अखेर हा व्यक्ती आजपर्यंत झोपलेलाच नाही. ते रात्रीच्या वेळी बसून असतात किंवा घरगुती कामे करतात. रात्रीच्या वेळी ते कधी कधी शेतातही काम करीत असतात!

## बॉम्बर विमानासारखा दिसणारा डेव्हिल रे

'मंटा रे' हा एक विशालकाय समुद्री जीव आहे, जो दिसण्यात काहीसा अमेरिकेच्या स्टील्थ बॉम्बर बी-२ विमानासारखा दिसतो. हा मासा त्याच्या मोठ्या त्रिकोणी पंखांसाठी ओळखला जातो. याला 'डेव्हिल रे' असेही म्हणतात. कारण त्याच्या डोक्यावर शिंगासारखे पंख असतात.

मंटाचा आकार कोणत्याही मोठ्या माशापेक्षा मोठा, म्हणजेच माशांच्या प्रजातींमध्ये सर्वात मोठा असतो. याची कमाल लांबी ७ मीटर (२३ फूट) पेक्षा जास्त असू शकते. रीफ 'मंटा रे'च्या पंखांचा फैलाव सरासरी सुमारे ११ फूट असतो. तर, विशाल महासागरीय 'मंटा रे'चा फैलाव २९ फुटांपर्यंत असू शकतो. हे मासे शांत स्वभावाचे असतात आणि सर्वसाधारणपणे त्यांच्यापासून मानवांना कोणताही धोका नसतो. 'मंटा'चे शरीर हिं?याच्या आकाराचे असते आणि त्याला त्रिकोणी पंख असतात. त्याच्या तोंडासमोर शिंगासारखे पंख असतात, ज्यांना 'सेफेलिक लोब' म्हणतात. हे पंख खाद्य घेण्यासाठी पाणी तोंडात घेण्यास मदत करतात.



मंटा रे 'मोबुलिडे' कुटुंबातील 'मोबुला' प्रजातीशी संबंधित आहे. याच्या दोन मान्यताप्राप्त प्रजाती आहेत : रीफ रे आणि विशाल महासागरीय मंटा रे. मंटा आपले बहुतेक आयुष्य महासागराच्या खोलवर घालवतात. किनाऱ्याजवळ त्यांचे येणे दुर्मीळ असते. ते विशेषतः हिंद-प्रशांत महासागराच्या किनारी प्रदेशात आढळतात. 'मरीन इकोलॉजी प्रोग्रेस सीरिझ'मध्ये प्रकाशित झालेल्या एका लेखानुसार, २०२२ मध्ये शास्त्रज्ञांना इक्वाडोरच्या किनारपट्टीवर मंटा रे माशांचा एक विशाल समूह दिसला होता.

मानवी गतिविधी आणि हवामान बदलामुळे अनेक प्राण्यांचे अधिवास आक्रसत असताना, त्यांच्या संख्येत वाढ होणे हे शुभ संकेत मानले जाते, ज्यामुळे पर्यावरणशास्त्रज्ञ आणि सागरी शास्त्रज्ञांमध्ये एक नवी आशा निर्माण झाली. मंटा प्रजातीचे मासे अत्यंत बुद्धिमान आणि शांत स्वभावाचे असतात. ते भोजन आणि प्रजननासाठी एकत्र येतात, अन्यथा संपूर्ण आयुष्य एकाकी राहतात. वैज्ञानिक अभ्यासातून हे सिद्ध झाले आहे की, ते आत्म-ओळख करू शकतात. मंटा रे माशाच्या या विशिष्ट शारीरिक रचनेची कॉपी अमेरिकेने एका सागरी शस्त्रासारखी केली आहे. यूएस नेव्हीची नवी पाणबुडी 'मंटा रे' संरक्षण कंत्राटदार नॉर्थोप ग्रुमनने डिझाईन केली आहे.

अत्यंत गोपनीय ठेवण्यात आलेली ही विशाल पाणबुडी गेल्या वर्षी जून २०२४ मध्ये चुकून गुगल मॅपवर दिसली होती. 'मंटा रे'चा प्रोटोटाईप कॅलिफोर्नियातील पोर्ट ह्यूनेमी नौदल तळावर उपस्थित होता, नंतर तो एका सामान्य जहाजाने बदलण्यात आला. त्यानंतर, इंटरनेट वापरकर्त्यांमध्ये सुरक्षा त्रुटीबद्दल चर्चा रंगली होती. 'मंटा रे'ने या वर्षाच्या सुरुवातीला पहिली सागरी चाचणी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे आणि त्यानंतर तिच्या अनेक चाचण्या घेतल्या जात आहेत.

## अवतरली सहा चाकी कार

'जपान मोबिलिटी शो २०२५' मध्ये टोयोटाची लक्झरी कार कंपनी लेक्सस आणि तिची मूळ कंपनी टोयोटा यांनी त्यांच्या भविष्यातील योजना जगासमोर मांडल्या. वाहनांमध्ये नावीन्यता



आणि आरामदायक सोयी कशा आणायच्या, यावर त्यांचे मुख्य लक्ष होते. लेक्ससने टोकियोत एक अनोखी सहा-चाकी 'एलएस' कॉन्सेप्ट व्हॅन सादर केली. जास्त जागा आणि सर्वोत्तम आरामदायक सुविधा देण्यासाठी तिची खास रचना करण्यात आली आहे.

लेक्ससची प्रमुख कार 'एलएस' मध्ये पूर्वी 'एस' चा अर्थ 'सेडान' असा होता. परंतु, आता टोयोटाचे अध्यक्ष अकियो टोयोडा यांनी 'एस' चा अर्थ बदलून 'स्पेस' केला आहे. यामुळे कंपनी आता फक्त सेडानपर्यंत मर्यादित न राहता अधिक मोकळ्या जागा देणाऱ्या गाड्या बनवू इच्छिते, हे दिसून येते. टोयोडा म्हणाले की, लेक्सस आता युरोपियन कार कंपन्यांची नक्कल करणार नाही, तर स्वतःच्या नवीन कल्पना आणि डिझाईन्स घेऊन येईल. लेक्ससच्या नवीन डिझाईनचे दोन मुख्य मंत्र आहेत : 'शोध घेणे' आणि 'कोणाचीही नक्कल न करणे'. कंपनीला विश्वास आहे की, त्यांची ही ६-चाकी कार सुखद, आरामदायक असेल आणि प्रत्येक प्रकारच्या रस्त्यावर सहजतेने धावेल.

## अंगठ्याच्या मुळाशी वेदना होताहेत...?


**पृनगट आणि अंगठ्याच्या सांध्यापाशी अचानक सुरू होणारी ठणक आणि एखादी वस्तू पकडताना होणारी तीव्र वेदना ही 'डी क्वर्व्हेन्स टेंडिनोसिस' या वैद्यकीय स्थितीचा संकेत असू शकतो. अंगठ्याच्या हालचालीवर नियंत्रण ठेवणाऱ्या स्नायूबंधांच्या (टेंडन्स) आवरणाला सूज आल्यामुळे ही स्थिती निर्माण होते.**

---

हाताच्या अंगठ्यापाशी होणाऱ्या वेदनांचे महत्त्वाचे कारण म्हणजे 'डी क्वर्व्हेन टेनोसायनोव्हायटिस' ही समस्या होय. मनगटाच्या बाजूला अंगठ्याच्या हालचालीसाठी कारणीभूत असलेल्या स्नायूंच्या नसांवर जेव्हा सूज येते, तेव्हा ही स्थिती उद्भवते. यामुळे साध्या दैनंदिन हालचाली करणेही रुग्णाला कठीण होऊन बसते. प्रामुख्याने अंगठा वळवणे, एखादी वस्तू घट्ट पकडणे किंवा मुठ आवळणे अशा क्रिया करताना तीव्र वेदना जाणवतात.

या आजाराची लक्षणे प्रामुख्याने अंगठ्याच्या खालच्या भागातील मनगटावर केंद्रित असतात. यात अंगठ्याच्या मुळाशी सूज येणे, हालचाल करताना अडथळा जाणवणे किंवा काहीतरी अडकल्यासारखे वाटणे ही प्राथमिक लक्षणे आहेत. कधीकधी हालचाल करताना सांध्यातून कडकड असा आवाजही येतो. वेळीच उपचार केले नाहीत तर या वेदना हाताच्या कोपरापर्यंत पसरू शकतात. विशेषतः ज्यावेळी आपण वस्तू उचलतो किंवा पिळतो, तेव्हा या वेदना अधिक तीव्र होतात.

वैद्यकीय दृष्टिकोनातून पाहता, आपल्या मनगटात अंगठ्याकडे जाणाऱ्या दोन महत्त्वाच्या नसा एका छोट्या बोगद्यासारख्या भागातून जातात. ज्यावेळी आपण सतत एकाच प्रकारच्या हालचाली करतो, तेव्हा या नसांच्या आवरणाला सूज येते. ही सूज वाढल्यामुळे नसांना त्या जागेतून मुक्तपणे हालचाल करणे कठीण जाते. सततच्या कामामुळे किंवा छंदांमुळे ही स्थिती उद्भवू शकते. उदाहरणार्थ, बागकाम करणे, खेळांमध्ये रॅकेटचा वापर करणे, तासनतास टायपिंग करणे किंवा अगदी लहान मुलाला वारंवार कडेवर उचलून घेणे यामुळे या नसांवर ताण येतो. तासनतास मोबाईलवर अंगठ्याचा वापर करून केल्या जाणाऱ्या हालचाली या विकाराला आमंत्रण देतात.



साधारणपणे तीस ते पन्नास वयोगटातील व्यक्तींमध्ये याचे प्रमाण अधिक आढळते. पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये हा त्रास होण्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच गरोदरपणात किंवा बाळंतपणानंतर शरीरातील संप्रेरकांच्या बदलांमुळे किंवा बाळाला सतत उचलल्यामुळे हा त्रास वाढू शकतो. याशिवाय संधीवात किंवा मनगटाला झालेली जुनी इजादेखील याला कारणीभूत ठरू शकते.

निदानासाठी 'फिंकेलस्टीन टेस्ट' यांसारख्या शारीरिक चाचण्यांचा वापर डॉक्टर करतात. यामध्ये अंगठ्याची विशिष्ट हालचाल करून वेदनेची तीव्रता तपासली जाते. उपचार पद्धतीमध्ये सुरुवातीला 'कन्झर्व्हेटिव्ह मॅनेजमेंट' म्हणजेच विना-शस्त्रक्रिया उपचारांवर भर दिला जातो. यामध्ये मनगटाच्या हालचालींवर मर्यादा आणण्यासाठी 'थम स्पायका स्प्लिंट'चा वापर अनिवार्य ठरतो.

अत्यंत गंभीर आणि जुनाट प्रकरणांमध्येच शस्त्रक्रिया अपरिहार्य ठरते. या शस्त्रक्रियेत स्नायूबंधांच्या आवरणावर असलेला ताण कमी करून त्यांना हालचालीसाठी जागा करून दिली जाते. आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानामुळे ही शस्त्रक्रिया अत्यंत प्रभावी ठरते आणि रुग्ण पुन्हा आपल्या दैनंदिन कामात सक्रिय होऊ शकतो. मात्र, हा त्रास पुन्हा उद्भवू नये यासाठी कामाच्या स्वरूपात बदल करणे आणि मनगटावर अतिरिक्त ताण येणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

उपचारांच्या दृष्टीने सुरुवातीला विश्रांती घेणे अत्यंत आवश्यक असते. वेदना देणाऱ्या हालचाली टाळणे, बर्फाने शेकणे आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने दाहशामक औषधे घेणे फायदेशीर ठरते. जर योग्य वेळी याकडे लक्ष दिले नाही, तर मनगटाची हालचाल कायमस्वरूपी मर्यादित होऊ शकते. त्यामुळे अंगठ्याच्या मुळाशी सतत वेदना होत असल्यास तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे हिताचे ठरते.

- डॉ. सम्यक पंचोली,
शोल्डर आणि अप्पर लिंब सर्जन,
संपर्क ८९८९३२९३२९

# आधी भूमिपूजनाचा शो, आता कर्जासाठी बँकांचे उंबरठे

**एक रुपयाची तरतूद नाही, तरी कोट्यवधींचा गाजावाजा करत सत्ताधाऱ्यांच्या 'इव्हेंटबाज' कारभारावर ठाकरे शिवसेनेचा निशाणा**




नगर – अहिल्यानगर मनपाने ₹११४.६९ कोटींच्या पाच व्यापारी संकुल प्रकल्पांसाठी तब्बल ₹८६.२६ कोटी कर्जातून उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे प्रशासनाच्या आर्थिक नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ज्या मनपाकडे स्वतःच्या उत्पन्नाचे ठोस नियोजन नाही, ती आता कोट्यवधींचे कर्ज घेऊन विकासाच्या नावाखाली भविष्यातील आर्थिक संकटाचे बीज पेरत असल्याची भीती, ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी व्यक्त केली आहे. नगरकरांना कर्जबाजारी करण्या ऐवजी बीओटी तत्त्वावर व्यापारी संकुले विकसित करावीत, अशी मागणी ठाकरे शिवसेनेने केली आहे.

कर्ज उभारणीसाठी सर्वसाधारण सभे समोर विषय चर्चेला असताना व मनपाने जाहिरात प्रसारित केल्या नंतर ठाकरे शिवसेना आक्रमक झाली आहे. काळे म्हणाले, नेहरू मार्केट, सर्जेपुरा रंगभवन, प्रोफेसर कॉलनी चौक, जुने एनसीसी कार्यालय आणि गंज बाजार येथील व्यापारी संकुलांसाठी जवळपास ₹८६.२६ कोटी रुपयांच्या कर्जाचा घाट घातला जात आहे. १५ मे च्या सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेवर हे विषय ठेवण्यात आले आहेत. मात्र हे होण्या आधीच यासाठी १३ मे रोजी मनपाने बँकां कडून प्रस्ताव मागणाऱ्या जाहिराती प्रसारित केल्या आहेत. हे म्हणजे, आंधळं दळतंय, कुत्र पीठ खातयं अशी मनपाची अवस्था झाली आहे. विशेष म्हणजे, नेहरू मार्केट प्रकल्पासाठी स्थानिक नेतृत्वाच्या प्रयत्नातून निधी उपलब्ध झाल्याचा आव मनपा कडून आणला गेला. मागील आठवड्यात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हातून भूमिपूजनाचा मेगा इव्हेंट करत मोठा गाजावाजा करण्यात आला. भूमिपूजन स्थळी ₹९.३४ कोटी रुपयांचा निधी आणल्याबद्दल भाजप–राष्ट्रवादीच्या नगरसेवकांकडून स्थानिक नेतृत्वाचे आभार मानणारी फ्लेक्स बाजी करण्यात आली. मात्र भूमिपूजना नंतर आता मनपालाच त्याच प्रकल्पांसाठी हातात कटोरा घेऊन बँकांकडे कर्ज मागावे लागत असल्याने त्या सर्व दाव्यांचे बिंग फुटले आहे. हे म्हणजे वराती मागून घोडं आणण्या सारखंच आहे, असा टोला काळे यांनी लगावला आहे. पालकमंत्री ज्येष्ठ व अत्यंत अनुभवी नेते आहेत. मात्र मनपाने मुख्यमंत्र्या नंतर आता पालकमंत्र्यांना ही खोटं ठरवलं आहे, अशी टिपण्णी काळेंनी केली आहे.

### घरात नाही दाणा आणि मला बाजीराव म्हणा

मनपाच्या जाहिरातीनुसार एकूण ₹११४.६९ कोटींपैकी ₹८६.२६ कोटी कर्ज आणि उर्वरित ₹२८.४३ कोटी मनपाचा स्वहिस्सा असणार आहे. मात्र स्वहिस्स्याची रक्कम उभारण्याची आर्थिक क्षमता मनपाकडे आज घडीला नाही. घरात नाही दाणा आणि मला बाजीराव म्हणा अशीच मनपाची अवस्था झाली असल्याची टीका काळे यांनी केली. शहराला कर्जबाजारी करणारे चुकीचे आर्थिक सल्ले देणारा, दबाव आणणारा तो तज्ञ कोण आहे, याचा शोध आम्हाला घ्यावा लागेल, असा इशारा त्यांनी दिला आहे. कालच सेवानिवृत्त मनपा कर्मचाऱ्यांनी थकीत वेतन मिळाव, सहाव्या वेतन आयोगातील थकीत नऊ हप्ते मिळावेत यासाठी मनपात आंदोलन केलं. आर्थिक अडचणीचे असे शेकडो विषय मनपा दरबारी घोंगावत आहेत. मनपाने ते आधी सोडवावेत, असा सल्ला काळेंनी दिला आहे.

### बाजारपेठेची ही स्थिती लक्षात घेणार आहात की नाही ?

या प्रकल्पांचे संपूर्ण आर्थिक गणित भविष्यातील गाळे विक्री, ई–लिलाव, नॉन–रिफंडेबल डिपॉझिट आणि भाडे वसुलीवर आधारित आहे. म्हणजेच उत्पन्न होईल या अंदाजावर मनपा शहराच्या माथी शेकडो कोटींचा कर्जबोजा टाकण्याच्या तयारीत आहे. व्यापार क्षेत्रात आधीच मंदी, ऑनलाईन मार्केटचा वाढता प्रभाव आणि रिकाम्या व्यापारी गाळ्यांची संख्या वाढत असताना एवढ्या मोठ्या व्यापारी संकुलांना अपेक्षित प्रतिसाद मिळेल याची कोणतीही शाश्वती प्रशासन देऊ शकत नाही. उद्या गाळे विकले गेले नाहीत किंवा भाडेकरू मिळाले नाहीत, तर या कर्जाचा बोजा थेट नागरिकांच्या करांवर आणि मूलभूत सेवांवर पडणार असल्याचा इशारा किरण काळेंनी दिला आहे.

### मनपाचा 'उत्पन्नाचा स्रोत' की ३० वर्षांची आर्थिक बंदी?

गाळ्यांचा ई–लिलाव, ३० वर्षांच्या लीजवर 'नॉन–रिफंडेबल डिपॉझिट', मासिक भाडे यातून कर्जाची रक्कम फेडू. यातून मनपाला उत्पन्नाचा स्रोत निर्माण होईल, असे आयुक्त डांगे सांगत आहेत. आयुक्तांच्या म्हणण्याप्रमाणे जर पुढील ३० वर्ष मनपाला कोणतेही उत्पन्न मिळणार नसेल तर कर्जाचा धोका कशासाठी ? हा प्रकल्प राबवण्याचा मनपाचा अट्टाहास असेल तर तो बीओटी तत्त्वावरच पूर्ण करून घ्यावा. शहराला वेठीस धरू नये, असा सल्ला किरण काळेंनी ठाकरे शिवसेनेच्या वतीने दिला आहे.

### एकदाच नगरकरांना सांगून टाकावं

₹१००० कोटींचे कर्ज काढणार नसल्याचा सारवा सारव करणारा खुलासा मनपा आयुक्तांनी काल केला. त्यावेळी व्यापारी संकुलांसाठी कर्ज घेण्याबाबत त्यांनी काही एक सांगितल नव्हतं. मात्र कर्ज काढण्याची मालिका काही थांबायच नाव घ्यायला तयार नाही. नेमकं किती हजार कोटींचं कर्ज शहरावर करण्याचा विडा मनपा व सत्ताधाऱ्यांनी उचलला आहे ?, हे आयुक्तांनी एकदाच नगरकरांना सांगून टाकावं असं आवाहन काळेंनी केल आहे. कोणी शहराला मातीत गाडायला निघाल असेल तर ठाकरे शिवसेना ते होऊ देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे.

### खोटारडेपणाचे फलक तात्काळ हटवा

₹९.३४ कोटी निधी आणल्याचा दावा करणारे सत्ताधाऱ्यांचे फलक अजूनही बाजारपेठेत झळकत आहेत. ही सरळ नगरकरांची दिशाभूल आहे. सत्ताधाऱ्यांच्या खोटारडेपणाच्या पाऊलखुणा असलेले ते फलक तात्काळ हटवावेत, अशी मागणी किरण काळे यांनी केली आहे.

### भूमिपूजन झाले, पण कामाचा मागमूस ही नाही

भूमिपूजन होऊनही अद्याप त्या ठिकाणी वाळूचा एक कण किंवा सिमेंटची एक गोणी देखील पोहोचलेली नाही. विशेष म्हणजे, या कामाचा कार्यारंभ आदेश एक वर्षांपूर्वीच देण्यात आला आहे. शून्य रुपयांची तरतूद असताना कार्यारंभ आदेश कसा देण्यात आला? भूमिपूजन कसे केले गेले ? हा प्रकार अत्यंत संशयास्पद असून याची सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी जाहीर मागणी किरण काळे यांनी केली आहे.

---

## अरिहंत जागृती मंचच्या खुल्या निबंध स्पर्धेत स्नेहल छाजेड प्रथम



पुणे – भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक निमित्त आयोजित 'जैन धर्माचे अस्तित्वाला धोका – कारण आणि समाधान' या विषयावरील खुल्या निबंध स्पर्धेत श्रीमती स्नेहल छाजेड यांना प्रथम क्रमांक मिळाला आहे. १८४ स्पर्धकांतून त्यांनी हे यश प्राप्त केले आहे. प्रशस्तिपत्र व रोख ३१०० रूपये असे बक्षिसाचे स्वरूप आहे.

---

# थॅलेसेमियामुक्त समाजासाठी लग्नापूर्वीच तपासणी करावी

### आयुष रुग्णालयातील शिबिरात तज्ज्ञांनी दिला सल्ला

नगर – दोन थॅलेसेमिया मायनर व्यक्तींचे विवाह झाल्यास प्रत्येक गर्भधारणेत थॅलेसेमिया मेजर बाळ जन्माला येण्याची २५ टक्के शक्यता असते. हे प्रमाण पंजाब, गुजरात आणि महाराष्ट्रामध्ये जास्त आहे. त्यामुळे भविष्यातील हा धोका टाळण्यासाठी प्रत्येकाने लग्नापूर्वी थॅलेसेमियाची तपासणी करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन ऋतुजा फाऊंडेशनच्या सचिव तथा सक्षमच्या प्राणदा प्रकोष्ठ प्रमुख ॲड. डॉ. अंजली केवळ यांनी केले.

जागतिक थॅलेसेमिया दिनाचे औचित्य साधून १२ मे रोजी तारकपूर रोड येथील आयुष रूग्णालय येथे थॅलेसेमिया रूग्णांसाठी विविध तपासणी व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ऋतुजा फाऊंडेशन, सक्षम संस्था, जिल्हा रूग्णालय, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि शांतिकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात थॅलेसेमिया रूग्णांची वार्षिक तपासणी, एच.एल.ए. टायपिंग नोंदणी, बोनमॅरो रजिस्ट्रेशन, रक्तदान, अवयवदान आणि थॅलेसेमिया मायनरची इलेक्ट्रोफोरोमिस तपासणी करण्यात आली.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश पैठणकर यांनी थॅलेसेमियाशी धैर्याने लढा देणाऱ्या मुलांचे आणि पालकांचे कौतुक केले. तसेच थॅलेसेमिया योद्ध्यांसाठी असलेल्या दिव्यांगांच्या कायद्यांविषयी सविस्तर माहिती दिली.



जागतिक थॅलेसेमिया दिनाचे औचित्य साधून तारकपूर रोड येथील आयुष रूग्णालय येथे थॅलेसेमिया रूग्णांसाठी विविध तपासणी व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुचेता यादव यांनी थॅलेसेमिया रूग्णांना सतत रक्त घेताना येणाऱ्या अडचणींवर कशी मात करावी, याचे मार्गदर्शन करत रुग्णांना सुकर आयुष्याचा मंत्र दिला. आयुष रुग्णालयाच्या प्रमुख डॉ. सोनाली बांगर यांनी थॅलेसेमिया कसा टाळता येऊ शकतो, यावर रुग्ण व पालकांशी संवाद साधला. तर हिमॅटोलॉजी डे केअर सेंटरच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रूपाली कुलकर्णी यांनी जिल्हा रुग्णालयातील सुविधांची माहिती देऊन रक्तदान व एच.एल.ए. टायपिंगचे महत्त्व पटवून दिले. उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनीही या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

थॅलेसेमिया सोसायटी महाराष्ट्र (पुणे) चे अध्यक्ष समीर निकम यांनी दुर्गम भागातील रुग्णांच्या व्यथा मांडल्या. शासनाने नोवल थेरेपीसाठी आवश्यक औषधांचा पुरवठा केल्यास अनेक रुग्णांना वारंवार रक्त घेण्याची गरज भासणार नाही, असे ते म्हणाले. ऋतुजा फाऊंडेशनच्या कार्याचा गौरव करत त्यांनी संस्थेला कायम पाठिंबा देण्याचे जाहीर केले.

सक्षम संस्थेचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत उपाध्यक्ष श्रीधर बापट, अध्यक्ष डॉ. राजीव चिटगोपीकर आणि उपाध्यक्षा संध्या कुलकर्णी यांनी सक्षम संस्था दिव्यांगांना स्वावलंबी बनवण्यासाठी करत असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला व दिव्यांग मित्र बनून मदत करण्याचे आवाहन केले. भारती कुलकर्णी यांनी सक्षम संघटन मंत्र आणि गीत सादर केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ॲड. अंजली केवळ यांनी केले. अध्यक्षीय सूचना डॉ. आशिष इग्मल यांनी मांडली. सूत्रसंचालन वर्षा पाठक–रोडे यांनी केले. सक्षमचे कोषाध्यक्ष सुनील जगदाळे यांनी आभार मानले.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी सूर्यकांत केवळ, महेश राहिंज, महेश केवळ, सक्षम माळुंके, अशोक तोडमल, तसेच अहमदनगर नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी व जिल्हा रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी हिराबाई साळुंके, गौरव पठाडे, ॲड. शेखर दरंदले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता समापन मंत्राने झाली.

---



भिंगारमध्ये छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करत हरदिन मॉर्निंग ग्रुपकडून स्वच्छता अभियान व वृक्षारोपण करण्यात आले.

# भिंगारमध्ये छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात

### हरदिन मॉर्निंग ग्रुपकडून स्वच्छता अभियान व वृक्षारोपण

नगर – हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क परिसरात आयोजित कार्यक्रमात स्वच्छता अभियान राबवून वृक्षारोपण करण्यात आले. तर मिठाईवाटप करुन जयंती सोहळ्याचा आनंद व्यक्त करण्यात आला. या जयंती सोहळ्याद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी सीए रविंद्र कटारिया आणि डॉ. दमन काशीद यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर उपस्थितांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून टाकला. यानंतर जॉगिंग पार्क परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. नागरिकांनी स्वयंप्रेरणेने सहभाग घेत परिसरातील कचरा हटवून स्वच्छतेचा संदेश दिला. त्याचबरोबर पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. सुनील जाधव आणि ताराचंद ठोकळ यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असून प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, अशोक पराते, जहीर सय्यद, रमेश वराडे, सुवेंद्र कटारिया, सचिन चोपडा, सुनील जाधव, सर्वेश सपकाळ, सुधीर कपाळे, अविनाश पोतदार, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, रतन मेहेत्रे, सचिन परदेशी, विलास आहेर, ताराचंद ठोकळ, दिलीप ठोकळ, दिपकराव घोडके, योगेश चौधरी, अभिजीत सपकाळ, दिलीप गुगळे, मराठा पतसंस्थेचे संचालक अच्युतराव गाडे, गणेश सातकर, नवनाथ वेताळ, इंजि. अनिल सोळसे, निजाम पठाण, नवनाथ खराडे, कुमार धतुरे, सरदारसिंग परदेशी, दिनेश शहापूरकर, दशरथ मुंडे, आनंद राठोड, दीपक अमृत, मेजर विनोद खोत, विशाल भामरे, एकनाथ जगताप, डॉ. गायत्री कुलकर्णी, प्रा. सारिका रघुवंशी, मीनाताई परदेशी आदी उपस्थित होते.

---

# छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीस्थळी स्वच्छता अभियान
# रांजणगावच्या गणपती मंदिरात सार्वजनिक स्वच्छतेची शपथ

### डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाचा उपक्रम



स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजी महाराज यांच्या समाधीस्थळी स्वच्छता अभियान राबवून जनजागृती करण्यात आली.

नगर – छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत स्वच्छतेचा संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम तुळापूर येथे राबविण्यात आला. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजी महाराज यांच्या समाधीस्थळी स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली.



पुणे जिल्ह्यातील तुळापूर येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या समाधीस्थळी उपस्थित राहून कार्यकर्त्यांनी प्रथम महाराजांना अभिवादन केले. त्यानंतर समाधी परिसर, परिसरातील सार्वजनिक जागा तसेच परिसरातील स्वच्छतेचे काम हाती घेत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमाद्वारे इतिहासाचे जतन, स्वच्छतेचे महत्त्व आणि सामाजिक जबाबदारी पटवून देण्यात आली.

यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, अशोक भालके, संदीप डोंगरे, ऋषीकेश चव्हाण यांच्यासह युवक उपस्थित होते. उपस्थित युवकांनी 'स्वच्छता हीच खरी सेवा' हा संदेश देत परिसर स्वच्छ ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

तसेच रांजणगाव (जि. पुणे) येथील गणपती मंदिरात दर्शन घेण्यात आले. मंदिर परिसरातही स्वच्छतेबाबत जनजागृती करत नागरिकांना सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्याची शपथ देण्यात आली. संस्थेच्या वतीने अशा प्रकारचे सामाजिक, ऐतिहासिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबविले जात असून भविष्यातही समाजप्रबोधनासाठी विविध उपक्रम घेण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज हे पराक्रम, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त केवळ अभिवादन करून थांबणे पुरेसे नाही, तर त्यांच्या विचारातून समाजासाठी काहीतरी विधायक करण्याची प्रेरणा घेणे आवश्यक आहे. स्वच्छता ही केवळ सरकारी मोहीम नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. समाधीस्थळी स्वच्छता अभियान राबवून इतिहासाबद्दलचा आदर आणि समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी व्यक्त करत आहोत. सार्वजनिक ठिकाणे, मंदिरे, ऐतिहासिक स्थळे आणि गाव परिसर स्वच्छ ठेवणे ही खरी देशसेवा आहे. युवकांनी मोबाईल आणि सोशल मीडियाच्या पलीकडे जाऊन समाजकार्यात सक्रिय सहभाग घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

---

# अहिल्यानगर जिल्ह्यात मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर

नगर – भारत निवडणूक आयोगाने १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनावर आधारित मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. या सखोल पुनरीक्षण कार्यक्रमास सर्व राजकीय पक्ष तसेच मतदारांनी आवश्यक ते सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.

या कार्यक्रमानुसार ३० जून ते २९ जूलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी भेट देऊन प्रगणना फॉर्म वाटप करणार आहेत. हे फॉर्म प्रत्येक मतदाराला दोन प्रतीत दिले जातील. मतदारांनी दोन्ही फॉर्म पूर्णपणे भरून अधिकाऱ्याकडे जमा करावेत व एका प्रतीवर पोहोच घेणे आवश्यक आहे. प्रगणना फॉर्म ऑनलाईन पद्धतीने भरून देण्याचीही सुविधा उपलब्ध असणार आहे. मतदारांचे सन २००२ च्या मतदारयादीशी मॅपिंग झाले असले तरीही सर्वांनी फॉर्म भरून देणे आवश्यक आहे. फॉर्म भरून न दिलेल्या मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीमध्ये समाविष्ट होणार नाहीत.

ज्या मतदारांचे प्रगणना फॉर्म प्राप्त होतील त्यांची प्रारूप मतदार यादी ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत यादीबाबत काही हरकती व दावे असल्यास नियमानुसार दाखल करता येतील. तसेच ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर २०२६ या दरम्यान प्रारूप मतदार यादीमध्ये समाविष्ट असणारे परंतु २००२ च्या यादीशी मॅपिंग न झालेले किंवा अचूक मॅपिंग न झालेले मतदार यांची मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाकडून सुनावणी घेतली जाईल. सुनावणीवेळी मतदारांनी आपला रहिवास व जन्माचा पुरावा दाखल केल्यावर त्यांची नावे अंतिम यादीत समाविष्ट होतील.प्रारूप मतदार यादीवर दाखल झालेले हरकती व दावे निर्गत करून ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने १४ मे रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. उपस्थित प्रतिनिधींना कार्यक्रमाची सविस्तर माहिती देऊन त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. सर्व राजकीय पक्षांनी प्रत्येक यादी भागाकरिता एक मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी नियुक्त करण्याचे आवाहन करण्यात आले असून नियुक्त प्रतिनिधींना मतदार नोंदणी अधिकारी स्तरावर प्रशिक्षण दिले जाईल.

---

# धर्मवीर संभाजीराजे जयंतीनिमित्त किराणा साहित्य भेट

### अखिल भारतीय छावा संघटनेच्यावतीने सामाजिक उपक्रम

नगर – धर्मवीर छत्रपती संभाजीराजे यांच्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत एक अनोखा उपक्रम राबविण्यात आला. निमगाव वाघा येथील नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेला किराणा साहित्याचे वाटप करून विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्यात आला.

धर्मवीर संभाजीराजे यांच्या विचारांप्रमाणे समाजहिताची भावना जोपासत जयंती उत्सव साजरा व्हावा, या उद्देशाने छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी हा उपक्रम हाती घेतला. संस्थेतील विद्यार्थ्यांना दैनंदिन उपयोगाचे किराणा साहित्य देत सामाजिक जाणिवेचा आदर्श निर्माण करण्यात आला.

यावेळी छावा संघटनेचे युवक आघाडी सचिव पश्चिम महाराष्ट्र दत्ता वामन, जिल्हाध्यक्ष सुरेखाताई सांगळे पाटील, बापू ठाणगे, दीपक गहिले, पिंटू पवार, दिलीप गायकवाड, रविकिरण वाघ, मयुर पवार, माधवी दांगट, प्रियंका म्हस्के, अनुराधा सुरर्स, मनिषा भोसले, शामल शिंदे, ज्योती शिंदे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दत्ता वामन म्हणाले की, धर्मवीर छत्रपती संभाजीराजे यांच्या जयंतीनिमित्त होणाऱ्या अनावश्यक व दिखाऊ खर्चाला फाटा देत समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा आमचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावणे हीच खरी जयंती साजरी करण्याची भावना व्यक्त करून सामाजिक कार्यातून युवकांनी प्रेरणा घ्यावी अशी भावना व्यक्त केली. बापू ठाणगे यांनी आभार मानले.



धर्मवीर छत्रपती संभाजीराजे जयंतीनिमित्त अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेला किराणा वाटप करण्यात आला.

